# अर्थबोधपत्रिका

**अंक ११ सप्टेंबर-ऑक्टोबर २०००**

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

जानेवारी २००० पासून अर्थबोधपत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू झाले असून दुसऱ्या वर्षाचा हा पाचवा अंक आहे. सलग क्रमांकानुसार हा अकरावा अंक आहे.

पुढील सहा अंक मिळविण्यासाठी देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : अंक ११ : सप्टेंबर-ऑक्टोबर २०००**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन: ५६५७१३२ / ५६५७२१० ई-मेल : ispe@vsnl.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | ३ |
| १. | बुद्ध्यांक भावनिक बुद्धिमत्ता | ४ |
| २. | अमेरिका : वाढती विषमता | ९ |
| ३. | जागतिकीकरणाकडून पर्यायी व्यवस्थेकडे | १५ |
| ४. | विकासासाठी हवे स्थानिक 'स्व'-राज्य | २० |
| ५. | जगात प्रथमच 'प्रोजेक्ट सीहॉर्स' | २६ |
| ६. | पहिलीपासून इंग्रजी | २८ |


**सूचना**

- अर्थबोधपत्रिकेच्या सहा अंकांचे देणगीमूल्य रुपये ५०/- (पन्नास रुपये फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठवावे. त्याबरोबर नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकाच्या शेवटी दिलेला आहे. कोणत्याही अंकापासून सभासद होता येते.
- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.
- अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख प्रसिद्ध केल्यावर 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.
- लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

## वाचकांचा प्रतिसाद

**आपले** हे द्वैमासिक मी जवळून वाचण्याचा प्रयत्न करीत आहे, कारण एकच की आजच्या मतामतांच्या गलबल्यात विचारी व विवेकप्रधान लेखन झाकले जाऊ नये. आपले दहा अंकातले लेखन विविध विषयांना स्पर्श करणारे जरी वाटले तरी काही त्रुटी जाणवतात. आपले हे नियतकालिक महिन्यातून एकदा तरी प्रसिध्द व्हावे. कारण अनेक विषय जेव्हा ताजे असतात, तेव्हा आपले प्रकाशन वाचकांच्या समोर येणे आवश्यक नव्हे काय ? पानांच्या मर्यादेबाबत सध्या बोलणे योग्य नव्हे. महत्त्वाच्या आर्थिक विषयांना येथे व्यासपीठ मिळाले पाहिजे. जागतिकीकरण या विषयाला योग्य स्थान मिळत असले तरी सध्याच्या गुंतवणूकदारांच्या समस्यांना प्राधान्य द्यावे. आपली पत्रिका माझ्या माहितीच्या स्नेह्यांपर्यंत जावी हे माझे प्रयत्न नेहमीच चालू असतात.

मंगेश नाबर, मुंबई.

**मी** आपल्या 'अर्थबोधपत्रिकेचा' जानेवारी २००० पासून सभासद आहे. निरनिराळ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक विषयांवरील राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींची माहिती मला मराठी भाषेत वाचावयास मिळते. सामान्य ज्ञानात भर पडते. या कार्याबद्दल अर्थबोधपत्रिकेला मन:पूर्वक धन्यवाद! आगामी अंकांमध्ये अमेरिका, चीन, व युरोपीय राष्ट्रे इत्यादिंच्या परराष्ट्र धोरणांबद्दल, आंतरराष्ट्रीय संबंधांबद्दल तसेच विविध प्रादेशिक संघटना उदा. 'एसिआन' (ASEAN) याबद्दल आणि त्यांच्या सध्याच्या कार्याबद्दल माहिती उपलब्ध करून दिलीत तर फारच उत्तम होईल.

केशव साळी, अहमदनगर.

**शिक्षणासंदर्भातील** तीनही लेख ('बहुविध बुध्दिमत्ता व शिक्षण', 'शिक्षण व जीवघेणी स्पर्धा ', 'सर्जनशीलतेचे बाळकडू व शिक्षण') विशेष प्रभावी वाटले. यातील मोजक्याच शब्दात आधिकाधिक माहिती देण्याचा प्रयत्न आवडला. या सर्व लेखांचे वाचन आमच्या गटसंमेलनात सर्व शिक्षकांसमोर नियमितपणे करीत आहे. त्याचप्रमाणे 'एक लोकशाही राष्ट्र' या विषयावरील आपल्या चर्चासत्रातील मुद्यांचा ऊहापोह आमच्याही मित्रमंडळींनी केला होता. आमचे बरेचसे मुद्दे आपल्या चर्चासत्रातील मुद्यांशी जुळून आलेत हे वाचून आम्हा सगळ्यांनाच समाधान वाटले. आपल्या द्वैमासिकासाठी वर्गणीदार मिळविण्याचा मी प्रयत्न करीन.

नरेंद्र खैरनार, विटाई, धुळे.

# संपादकीय

अर्थबोधपत्रिकेचा हा अकरावा अंक. माहितीपेक्षा वैचारिकतेकडे झुकणारा. विचार हे मेंदूचे कार्य. इतर प्राणीमात्रांपेक्षा 'वेगळा' विचार करणारा मेंदू व त्याच्याशी संबंधित असणारी बुद्धिमत्ता मिळाल्याने मानवाने बुद्धिमत्तेच्या बाबत संशोधन केले. हेच संशोधन किती विविधांगांनी पुढे जात आहे, याचा उल्लेख यापूर्वी काही लेखांमधून आला आहे, या अंकात भावनिक बुद्धिमत्तेच्या अंगाने पुढे जाणा-या संशोधनाबाबत काही माहिती 'बुद्ध्यांक व भावनिक बुद्धिमत्ता' या लेखात देण्यात आली आहे. अनेक समजूतींना मागे टाकणाऱ्या याच लेखाचे सूत्र इतरही लेखांमध्ये वेगळ्या प्रकारे पण ओघाने आले आहे. अमेरिका म्हणजे श्रीमंती, समानता या समजूतीला छेद देणारी 'अमेरिकेतील विषमता' वाचकांना वेगळ्या विचारांकडे प्रवृत्त करू शकेल. विषमता वाढविणाऱ्या जागतिकीकरणाला पर्याय शोधण्याचा प्रयत्न अनेक राष्ट्रांतील विचारवंत करीत आहेत. या पर्यायांबाबतची माहिती 'जागतिकीकरणाकडून पर्यायी व्यवस्थेकडे' या लेखात देण्यात आली आहे.

विकासासाठी जागतिकीकरण होणे गरजेचे आहे, असे जागतिकीकरणाचे समर्थक नेहमीच म्हणत आले आहेत. जागतिकीकरणातून होणाऱ्या विकासाची वाट बघण्यापेक्षा आपणच आपला विकास करावा, या जाणीवेतून केरळमधील छोट्या छोट्या ग्रामपंचायतींचा झालेला विकास नव्या दिशेकडे घेऊन जाईल. जग जवळ येत असले आणि अनेक संस्कृतींची सरमिसळ होत असली तरी, प्रत्येक राष्ट्र दुसऱ्यापेक्षा, इतर व भौगोलिकदृष्ट्या 'वेगळे' आहे. ही विविधताच मानवी समूहाला जगण्यासाठी सहाय्य करीत असते. म्हणूनच ही विविधता जपण्याचा प्रयत्न होत आहे. आशियातील अशा एका प्रयत्नाबाबत आपण जाणून घेणार आहोत 'जगातील प्रथमच 'प्रोजेक्ट सीहॉर्स' या लेखातून.

विकास होण्यासाठी 'स्व-भाषा' हे महत्त्वाचे साधन आहे. सध्या भारतात विशेषत: महाराष्ट्रात विकासासाठी 'स्व-भाषा' नव्हे तर इंग्रजी येणे महत्त्वाचे आहे, अशी चर्चा सुरू आहे. याबाबतची मतमतांतरे 'पहिलीपासून इंग्रजी' या लेखात मांडण्यात आली आहेत. अर्थबोधपत्रिकेचे स्वरूप वाचकांना कितपत रुचते ते जाणण्याची उत्सुकता आम्हाला नेहमीच असते. यासाठी वाचकांकडून प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा आहे.

■■

# बुद्ध्यांक आणि भावनिक बुध्दिमत्ता

बुद्धिमत्तेच्या संदर्भात गेल्या काही वर्षात बरेच नवे संशोधन होत गेले आहे. त्याच्या आधारे अनेक नवे विचार, नव्या संकल्पना उदयाला आल्या आहेत. नवनवीन लेख व ग्रंथ निर्माण होत आहेत. या नव्या संकल्पनांचा नि विचारांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर व्यवस्थापनाच्या क्षेत्रात केला जात आहे. त्यामुळे व्यवस्थापनाच्या अंगाने या विषयावर प्रकाश टाकणारे बरेचसे लिखाण पुढे येत आहे.

व्यवस्थापनाइतकेच किंवा त्यापेक्षाही आधिक महत्त्वाचे क्षेत्र आहे शिक्षणाचे. बालशिक्षणाचे व प्राथमिक शिक्षणाचे. माध्यमिक व उच्च शिक्षणाचे. भारतात या सर्वच शैक्षणिक स्तरांवर पठडीबद्ध नि दर्जाहीन शिक्षणाने घट्ट पाय रोवले आहेत. त्यात मूलभूत परिवर्तन आणि तेही त्वरेने न होणे, देशाला महाग पडणारे आहे. हे परिवर्तन का व कसे व्हावे, याची एक दिशा या नवसंकल्पनांतून व नवविचारांतून स्पष्ट होते.

समाजात काही माणसे बुद्धिमान म्हणूनच जन्माला येतात तर काही माणसे फारशी बुद्धिमान नसतात. बुद्धी ही बरीचशी वारशाने व काही वातावरणातून प्राप्त होते, कुटुंबातील पहिल्या मुलांना नंतरच्या मुलांपेक्षा तुलनेने अधिक बुद्धिमत्ता असते; अशा तऱ्हेचे काही गैरसमज पूर्वापार दृढ झालेले आहेत. जीवनात यशस्वी व्हायचे तर केवळ बुद्धिमत्तेचेच वरदान असले पाहिजे, अशीही समजूत दीर्घकाळ टिकून आहे.

**बुद्धिमापनाच्या कसोट्या**

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून तर बुद्धिमापनाचे प्रयत्नही सुरू झाले. फ्रान्समधील अल्फ्रेड बिने (Alfred Binet) याने १९०५ साली, प्रथमत: बुद्धिमापनाच्या कसोट्या तयार केल्या. विशिष्ट वयाच्या मुलांना सर्वसामान्यपणे कोणत्या क्षमता कितपत आत्मसात असाव्यात, याचा विचार करून यांपैकी मोजता येतील अशा क्षमतांवर आधारित असे प्रश्न तयार केले, व या चाचण्यांच्या आधारे मुलाचे मानसिक वय जोखण्याचा प्रयत्न केला. जर्मनीतील

लुई विल्यम स्टर्न (Louis William Stern) यांनी १९१२ मध्ये, मुलांच्या चाचण्यांचे निष्कर्ष आकड्यात मांडण्याचा प्रयत्न केला. तर १९१६ साली लुई टर्मन (Louis Terman) याने बिनेच्या चाचणीपद्धतीत सुधारणा करून कमी तसेच जास्त बुद्धिमत्तेचे मोजमाप करण्याची, म्हणजे विशिष्ट चाचण्यांच्या आधारे बुद्ध्यांक मोजण्याची पध्दत रूढ केली. या स्टनफोर्ड-बिने चाचण्या पंधरा वर्षाखालील मुलांच्या बुद्ध्यांक मापनासाठी आजही वापरल्या जातात. परंतु हार्वर्ड गार्डनर यांनी आपल्या 'फ्रेम्स ऑफ माईंड' (१९८३) या ग्रंथात असे दाखवून दिले की सामान्यत: बुद्ध्यांक मापनात जी बुद्धिमत्ता मोजली जाते तीच एकमेव बुद्धिमत्ता असते असे नाही. त्याने माणसाला निसर्गत:च प्राप्त होणाऱ्या विविध बुद्धिमत्तांचा पटच उलगडून दाखवला. गार्डनर व त्याच्या सहकाऱ्यांनी अशा जवळजवळ वीस बुद्धिमत्तांचा उल्लेख केला आहे. त्यामुळे माणसाला जीवनात यशस्वी होण्यासाठी मापनातून विचारात घेतली जाणारी बुद्धिमत्ताच आवश्यक असते असे आता मानले जात नाही. गार्डनर यांनी म्हटले आहे की, "आता अशी वेळ आली आहे की आपण बुद्धिमत्तेविषयीची आपली संकल्पनाच विस्तारली पाहिजे. शाळेतील विद्यार्थ्याला ज्या तऱ्हेची बुद्धिमत्ता असेल तिच्याशी सुसंगत आणि जिथे मुलगा चमकू शकेल व त्याला समाधानही मिळेल अशा क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी, मुलाला तयार करणे हेच शिक्षणाचे मोठे योगदान ठरेल. आजपर्यंत आपण या बाबींकडे दुर्लक्ष करीत आलो आहोत. त्याऐवजी आपण प्रत्येकालाच असे शिक्षण देत आहोत की, ज्यात तो यशस्वी झाला तर तो केवळ कॉलेजमधील प्राध्यापक व्हायला लायक ठरू शकेल, आणि प्रत्येकजण या संकुचित अशा यशाकडे वाटचाल करत आहे किंवा नाही यावरच आपण प्रत्येकाचे मूल्यमापनही करतो. आपण आता विद्यार्थ्यांचे क्रमांक लावण्यात आपला वेळ खर्च न करता, त्यांच्या उपजत क्षमतांचा शोध घेण्याकरिता आणि त्यांचा विकास करण्यासाठी वेळ द्यायला हवा. यशस्वी होण्याचे अक्षरश: हजारो मार्ग आहेत आणि तिथे पोचण्याच्या अन्य कितीतरी वेगवेगळ्या प्रकारच्या क्षमता आहेत".

## बुद्ध्यांकाच्या मर्यादा

पारंपरिक बुद्ध्यांक मापनाच्या व त्यावर आधारित निष्कर्षांच्या अनेक मर्यादा आता दिसून येत आहेत. उदाहरणार्थ, ज्यांचा कॉलेजच्या काळात बुद्ध्यांक खूप मोठा होता अशांचा, त्यांच्या मध्यमवयीन जीवनाचा, शोध घेतला तेव्हा असे आढळले की, पगार, उत्पादकता किंवा प्रतिष्ठा अशा निकषांवर

जोखले असता, ही मोठा बुद्ध्यांक असणारी मंडळी, त्यांच्यापेक्षा कमी बुद्ध्यांक (कॉलेजच्या काळात) असलेल्यांपेक्षा अधिक यशस्वी ठरली आहेत असे नाही; किंवा त्यांचे आयुष्य अधिक समाधानी झाले आहे, अथवा स्नेहीमंडळी, कुटुंब आणि अगदी व्यक्तिगत प्रेमजीवनातही इतरांच्या मानाने आधिक समाधान प्राप्त केले आहे, असे आढळले नाही.

थोडक्यात असे की पारंपरिक कल्पनेप्रमाणे मोठा बुद्ध्यांक असणे म्हणजे यशाची गुरुकिल्ली आहे आणि बुद्ध्यांक कमी असणे म्हणजे जीवनात केवळ अपयश किंवा खालच्या स्तराचेच जीवनमान प्राप्त होणार, असे मानण्याचे काही कारण नाही. किंवा मोठा बुद्ध्यांक असला म्हणजे मोठ्या पगाराच्या नोकऱ्या आणि कमी बुद्ध्यांक म्हणजे श्रमजीवी आयुष्य, असेही मानण्याचे कारण नाही. कारण, आजपर्यंत गृहित धरलेल्या या नियमाला अपवादच जास्त आहेत. मोठा बुद्ध्यांक असणे हे यशाचे गमक आहे, या गृहिताला छेद देणारीच अनेक उदाहरणे व्यवहारात दिसून येतात. डॅनियल गोलमन यांनी आपल्या 'इमोशनल इंटलिजन्स' ह्या ग्रंथात असे म्हटले आहे की उपर्युक्त गृहिताला असणारे अपवादच मूळ नियमापेक्षा जास्त आहेत. जीवनात यश प्राप्त करुन देणाऱ्या ज्या विविध बाबी आहेत त्यात बुद्ध्यांकाचा वाटा फार तर वीस टक्केच असेल; बाकी ऐंशी टक्के वाटा इतरच घटकांचा असतो. गोलमन यांनी स्पष्टीकरण दिले आहे: "आयुष्यातील चढ-उतारांमुळे जे काही कल्लोळ किंवा संधी निर्माण होतात, त्यांना तोंड देण्याची काहीही तयारी शैक्षणिक (पारंपरिक) बुद्धिमत्ता करू शकत नाही. मोठा बुद्ध्यांक म्हणजे आयुष्यात संपन्नता, प्रतिष्ठा किंवा समाधान प्राप्तीची हमी नाही; असे असले तरीही आपल्या शाळा आणि आपली आजची संस्कृतीसुद्धा केवळ शैक्षणिक क्षमतांवर भर देतात; आणि जी एकप्रकारे आपले भविष्यच घडविणारी आपली वैशिष्ट्ये म्हणून असणारी - 'भावनिक बुद्धिमत्ता', तिच्याकडे डोळेझाक करतात.

**भावनिक बुद्धिमत्ता**

आपले भावनिक जीवन हे असे एक क्षेत्र आहे की जे गणित किंवा वाचन याचप्रमाणे कमी-अधिक कौशल्याने हाताळता येते व त्यासाठी काही खास क्षमताही असाव्या लागतात. आणि, एखादा मनुष्य आयुष्यात यशस्वी का होत जातो, त्याचवेळी दुसरा तेवढ्याच बुद्धिमत्तेचा मनुष्य मध्येच का थबकतो हे कळण्यासाठीही भावनिक कुशलता अंगी असावी लागते. प्राथमिक बुद्धिमत्तेबरोबरच आणखी इतर जी कौशल्ये आपल्या अंगी आहेत, त्यांचा किती

चांगला उपयोग आपण करू शकतो, हे आपल्या अंगभूत अशा भावनिक क्षमतेने ठरत असते". या भावनिक क्षमतेला, हॉवर्ड गार्डनर यांनी आपल्या 'विविध बुद्धिमत्ते'च्या सिध्दांतात 'व्यक्तिभूत बुद्धिमत्ता' (पर्सनल इंटलिजन्स) या नावाने स्थान दिले आहे. त्याने व्यक्तिभूत बुद्धीमत्तेचे दोन प्रकार कल्पिले आहेत. एक म्हणजे, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता (इंटरपर्सनल इंटलिजन्स) आणि दुसरा प्रकार म्हणजे, व्यक्ती-अंतर्गत बुद्धिमत्ता (इंट्रापर्सनल इंटलिजन्स). दुस-या व्यक्तींना समजून घेणारी बुद्धिमत्ता म्हणजे आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता होय. ज्यांना ही क्षमता अवगत असते, अशा व्यक्ती दुसऱ्यांशी चांगले जुळवून घेतात, त्यांच्याशी सहकाराने वागतात. व्यक्ती-अंतर्गत बुद्धिमत्ता म्हणजे स्वत:त डोकावून पाहण्याची क्षमता. स्वत:विषयीचे नेमके अंदाज करता येणे व त्यानुसार जीवनात वागता येणे, या गोष्टी अशा व्यक्तीला अवगत असतात. सॅलोवी या येल विद्यापीठातील मानसशात्रज्ञाने गार्डनरच्या व्यक्तिभूत बुद्धिमत्तांचा विस्ताराने अर्थ दिला आहे. त्याच्या मते, भावनिक बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात पाच प्रकारच्या क्षमता सामाविलेल्या असतात:

१) आत्मभान: स्वत:च्या भावना ओळखता येणे किंवा त्याची जाण असणे. ज्याला आपल्या भावनांचा नेमका वेध घेता येतो, ते आपल्या निर्णयांबाबत पक्के जागृत असतात व आपल्या आयुष्याला चांगले वळण लावू शकतात.

२) आत्मनियंत्रण: स्वत:च्या भावना योग्य त-हेने हाताळता येणे; किंवा भावनांवर नियंत्रण ठेवणे. जे यात तरबेज असतात ते आयुष्यातील अपयशांतून किंवा कठीण प्रसंगातूनही सावरतात मात्र ज्यांचे आपल्या भावनांवर नियंत्रण नाही, असे लोक लहान-सहान अडचणीत किंवा अपयशाने खचून जातात.

३) अभिप्रेरण: स्वत:च्या भावनांना योग्य दिशेने वळण लावता येणे. एखाद्या ध्येयाने प्रेरित होणे, लक्ष केंद्रित करता येणे, किंवा तज्ज्ञता किंवा सर्जनशीलता प्राप्त करणे या गोष्टी भावनांना योग्य दिशेने नेण्याने साध्य होतात. हे करू शकणारे लोक आपापल्या कामात अधिक परिणामकारक ठरतात.

४) सहसंवेदन: दुसऱ्यांच्या भावना ओळखता येणे. असे लोक दुसऱ्यांच्या भावनांची कदर करतात, सहानुभूती दर्शवितात किंवा दुसऱ्यांच्या गरजा नेमकेपणाने ओळखतात.

५) सामाजिकता: सामाजिक परस्परसंबंध हाताळता येणे. म्हणजेच दुसऱ्यांच्या भावना हाताळता येणे. सामाजिक संबंधांमध्ये, कार्यांमध्ये अशा व्यक्ती अधिक प्रभावी असतात.

भावनिक बुद्धिमत्ता मानवी जीवनात जेवढी महत्त्वाची आहे तेवढीच तिची जोपासना करता येते, ती वाढविता येते हेही महत्त्वाचे आहे. डॅनिएल गोलमन यांनी दाखवून दिले आहे की मूलभूत अशा भावनिक क्षमता मुले शिकूही शकतात आणि त्या वाढवूही शकतात. त्यांना तसे शिकवले तर मुले एखाद्या घटनेमुळे होणा-या आपल्या त्वरित प्रतिक्रियांचे - उदाहरणार्थ राग येण्याचे वगेरे - विश्लेषण करून, या प्रतिक्रियांनांही पर्याय असू शकतात, हे चांगल्या तऱ्हेने शिकतात. त्यातून त्यांची सामाजिकतेची क्षमता चांगली वृद्धिंगत होऊ शकते.

**सामाजिक क्षमता**

दुस-याच्या भावना समजावून घेणे, त्यांची कदर करणे, व्यक्तीव्यक्तींच्या भावनात नि विचार करण्याच्या पध्दतीत असणारे फरक स्वीकारणे, या गोष्टी म्हणजे सामाजिक क्षमता होय. गोलमन यांनी म्हटले आहे की, माणसाचे परस्परसंबंध महत्त्वाचे असतात. चांगला श्रोता असणे आणि प्रश्न विचारायला उद्युक्त होणे; दुसरा काय सांगतो किंवा करतो आणि आपल्याला काय वाटते, आपले मत काय आहे यामध्ये फरक करता येणे; दुस-यांच्या मतांचा अगदी राग येणे किंवा दुस-या टोकाला जाऊन त्याविषयी उदासीन असण्यापेक्षा, आपल्या मताविषयी आग्रही असणे, सहकाराची कला शिकणे, संघर्ष मिटविण्याचे गुण आत्मसात करणे आणि चर्चेने सुसंवाद साधणे या सर्व गोष्टी सामाजिक क्षमतेत येतात.

जीवनात यशस्वी होण्यासाठी, बुद्ध्यांकापेक्षाही भावनिक बुद्धिमत्तेचा भाग जास्त महत्त्वाचा आहे. आणि ही बुद्धिमत्ता केवळ लहान वयातच नव्हे तर वयाबरोबर, अनुभवाबरोबर तसेच प्रत्यक्ष लक्षपूर्वक प्रयत्न करून वाढू शकते. शाळा या बुद्ध्यांकाच्या एकसूरी विचारावर बेतण्यापेक्षा भावनिक बुद्धिमत्तेच्या विकासाच्या पध्दतीवर आधारित अशा घडवल्या तर मानवी जीवनातील अनेक मानवी संबंधांतील ताणांमधून निर्माण होणारे प्रश्न सुटू शकतील. माणसा-माणसांमधील व्यवहार आधिक समंजस अशा पायावर उभे राहतील. दुसऱ्या माणसांना सहन करण्याची शक्ती आणि दुसऱ्या माणसांबद्दल वाटणारी सहानुभूती या पायांवर शिक्षणाची नवी मूल्यचौकट उभी करायला हवी. जागतिक सहकाराची तीच जननी ठरेल; त्यानेच माणसांचे जीवन प्रगल्भ होईल.

■■

# अमेरिका: वाढती विषमता

अमेरिकेबद्दल बहुतेक सर्व राष्ट्रांतील नागरिकांमध्ये एक प्रकारचे कौतुकमिश्रीत कुतूहल असते. अमेरिका म्हणजे सर्वप्रकारच्या परिपूर्णतेचा एक भव्य आविष्कार, अमेरिका म्हणजे श्रीमंती, समृद्धी, पैशाचा एक भूलभूलैय्या, अमेरिका म्हणजे स्वच्छता, प्रदूषणविरहित हवा, मुबलक पाणी, सार्वजनिक शिस्त असे अनेक प्रकारचे समज अनेक राष्ट्रांत पसरले आहेत. भारतातही अमेरिकेबद्दल हीच धारणा असणारे नागरिक जास्त असतील. अर्थात यातील अनेक समज, ही वस्तुस्थिती असेलही, पण याचा अर्थ, तिथे कोणतेच प्रश्न नाहीत असा नक्कीच नाही.


एकविसाव्या शतकाचा, जागतिकीकरणाचा, त्या अनुषंगाने अमेरिकेतील भांडवलशाहीचा व मुक्त व्यापाराच्या तत्त्वाचा जो काही उदोउदो चालू आहे, त्यावरून, अमेरिकेची अर्थव्यवस्था एकदम 'परफेक्ट' असून नागरिकांचे जीवनमान खूपच उंचाविणारी आहे, असा समज भारतातील अर्थकारणात, राजकारणात व समाजकारणात पसरत आहे. त्यामुळे येथे त्यांच्या अंधानुकरणाचे स्तोम माजत आहे. तेव्हा अमेरिकेच्या खुल्या अर्थव्यवस्थेचा व मुक्त व्यापाराचा तेथील नागरिकांवर नक्की काय परिणाम झाला आहे, याचा सर्वंकष विचार आपण केला पाहिजे. आपल्या देशाला त्याचा किती उपयोग होईल याचा अंदाज बांधून मगच त्याचे अनुकरण करण्याचे ठरविले पाहिजे. अमेरिकेतील नियतकालिके 'एक्झिक्युटिव्ह इंटलिजन्स रिव्ह्यू' (ई. आय. आर.) व 'बिझिनेस वीक' आणि आर्थिक विषयांवरील प्रसिध्द नियतकालिक 'द इकॉनॉमिस्ट' व भारतातील 'द इकॉनॉमिक टाईम्स' यांमध्ये यासंदर्भात विशेष लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे व आकडेवारीचा विचार येथे केला आहे.

## उत्पन्नातील दरी वाढली

गेल्या दोन दशकांपासून अमेरिकेत श्रीमंतच अधिक श्रीमंत होत आहेत व मध्यमवर्गीयांची मिळकत कमी होत आहे. अमेरिकेत श्रीमंतांची संख्या २० टक्के व मध्यमवर्गीयांची संख्या ८० टक्के आहे. मिळकतीतील ही घसरण व तफावत पुढील आलेखावरून स्पष्ट होईल. अमेरिकेच्या काँग्रेसमधील एक शाखा

असलेल्या 'काँग्रेशनल बजेट ऑफिस' (सी. बी. ओ.) तर्फे मिळालेल्या माहितीच्या आधारे 'एक्झिक्युटिव्ह इंटलिजन्स रिव्ह्यू' ने हा आलेख प्रसिद्ध केला आहे.

*श्रीमंत व गरीब गटातील करोत्तर वास्तव उत्पन्नाबाबतचा आलेख*




खरे तर गेल्या काही वर्षांपासूनच अमेरिकेच्या उद्योग-अर्थव्यवस्थेत तेजीचे वातावरण आहे, असे म्हटले जाते. त्यामुळे अमेरिकेतील रोजगाराच्या संधी आणि नागरिकांचे उत्पन्न यात, त्या प्रमाणात वाढ व्हायला हवी. पण प्रत्यक्षात मात्र या तेजीच्या वातावरणाचा फायदा अशा प्रकारे झालेला आढळत नाही. १९७७ मध्ये अमेरिकेतील श्रीमंत व अतिश्रीमंत गटातील सुमारे एक टक्का (१२ लाख) कुटुंबांचे एकूण करोत्तर वास्तव उत्पन्न, राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७.३% एवढे होते. तेव्हा तेथील निम्नगटातील सुमारे ३८% (सुमारे साडेचार कोटी) कुटुंबांच्या करोत्तर वास्तव उत्पन्नांचे हेच प्रमाण १६.२% एवढे होते. शक्यता वर्तविली जाते की विसाव्या शतकाच्या अखेरीस श्रीमंत व अतिश्रीमंत गटातील उत्पन्नाचे प्रमाण १३% वर जाईल, त्याचवेळी निम्नगटातील लोकांच्या उत्पन्नाचे प्रमाण १२.९% पर्यंत खाली घसरेल.

श्रीमंत गटातील व्यक्तींना भांडवलावरील नफा (Capital gain) जास्त प्रमाणात मिळतो आहे. अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार भूमी, श्रम, भांडवल व संघटन या चारांपैकी ज्या घटकाचा संख्यात्मक व गुणात्मक वापर वाढतो, त्या घटकाचे उत्पन्न वाढते. अमेरिकेने स्वीकारलेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलसघनता वाढल्याने त्यांच्याशी संबंधित घटकांचे - व्यक्तींचे उत्पन्न वाढले. त्यामुळे मध्यमवर्ग व निम्नवर्ग यांच्या उत्पन्नात घट झाली. परिणामी गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावली. अमेरिकेत प्रत्यक्षात जे घडले तेच येथे अर्थशास्त्रीय शब्दात मांडले आहे. तेव्हा भारतात देखील खुल्या आर्थिक

धोरणांचा स्वीकार करताना या उदाहरणाचा विचार व्हायला हवा. निव्वळ अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून वरील विषयाच्या आकडेवारीत व खोलात न जाता, अमेरिकेतील नागरिकांचे यावर नेमके काय मत आहे ते ही जाणून घेणे योग्य ठरेल.

**अमेरिकेतील नागरिक काय म्हणतात ?**

'बिझिनेस वीक' या अमेरिकेतील नियतकालिकाने यासंदर्भात एक जनमतचाचणी (हॅरिस पोल) केली आहे. या जनमतचाचणीतून काही महत्त्वाच्या बाबी उघडकीस आल्या.

- अमेरिकेतील सध्याच्या आर्थिक धोरणांमुळे व उद्योग व्यापारातील तेजीमुळे मिळकतीतील असमानता वाढली. म्हणजेच गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावली असे ७५ टक्के नागरिकांनी म्हटले आहे.
- सर्वसामान्य नागरिकांचे राहणीमान उंचाविण्यासाठी उद्योगक्षेत्रातील भर-भराटीचा फारच थोडा फायदा / उपयोग झाला, असे ६९ टक्के नागरिकांनी म्हटले आहे.
- सिएटल येथे झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीपातळीवरील परिषदेच्या वेळी (नोव्हेंबर-डिसेंबर ९९) जगभरातील विविध संघटनांनी मुक्त जागतिक व्यापाराविरुद्ध केलेल्या निदर्शनांना, ५२ टक्के नागरिकांनी आपला वैचारिकदृष्ट्या पाठिंबा असल्याचे सांगितले.
- मोठ्या कंपन्या व मोठे उद्योगसमूह यांच्या हातात सध्या फार मोठ्या प्रमाणावर 'सत्ता', असून पूर्वी उद्योगजगतावर सर्वसामान्यांचा जो विश्वास होता, तो आता राहिलेला नाही, असे मत बहुतांश नागरिकांनी व्यक्त केले.
- तंत्रज्ञानातील सततच्या नवनवीन बदलांमुळे नागरिकांमध्ये एक प्रकारची अस्वस्थता व चीड असून त्याचा विपरित परिणाम उद्योगांवर होऊ शकतो, असे मत 'नॅशनल असोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स' चे अध्यक्ष जेरी जासिनोवस्की यांनी व्यक्त केले.
- जननिक परिवर्तित (जेनेटिकली मॉडीफाईड - जी. एम.) अन्नपदार्थांमुळे आपले जीवन, आपल्या हातात राहिले नसल्याची जाणीव नागरिकांमध्ये पसरत असून, यासाठी ते मोठमोठ्या उद्योगांना दोषी धरतात असे आढळले.

- मुक्त जागतिक व्यापार बहुतांश व्यक्तींना, ग्राहकांच्या दृष्टिकोणातून उपयोगी वाटत असला, तरी त्यामुळे अमेरिकेत नोकऱ्यांच्या संधी वाढण्याची शक्यता नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

**काही फायदेही**

अमेरिकेच्या मुक्त व्यापाराच्या तत्त्वज्ञानाने व अर्थव्यवस्थेच्या भांडवलशाही प्रतिमानाने अमेरिकेला आजपर्यंत काही फायदे नक्कीच झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेबरोबर स्पर्धा करू शकणारी राष्ट्रे आपापल्या प्रश्नांत अडकली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेला मजबूत स्पर्धक उभा राहिला नाही. डॉलरला आंतरराष्ट्रीय व्यापारात मिळालेल्या परिवर्तनीयतेमुळे अमेरिकेतील उद्योजकांचा, नागरिकांचा मोठा फायदा झाला. आपले चलन वापरून त्यांना इतर देशातील उत्पादने, वस्तू, सेवा विकत घेता आल्या. अमेरिकेतील व्यापाराच्या नियमांमुळे, नियामक मंडळांमुळे (Regulatary Boards) तेथे मुक्त व्यापार स्थिरावू शकला. इतर राष्ट्रे अजून या नियमांच्या चक्रातच अडकली आहेत.

मुक्त अर्थव्यवस्थेचे वरील फायदे अमेरिकेला झाले असले तरी तेथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे, अमेरिकेतील मुक्त व्यापार हा संपूर्णपणे मुक्त कधीच नव्हता. अमेरिकेलाही आपल्या उद्योगांचे हित जपण्यासाठी वेळोवेळी संरक्षणवादी (प्रोटेक्शनिस्ट) भूमिका घ्यावी लागली आहे. (अर्थबोध पत्रिका - नमुना अंक - नोव्हेंबर १९९८ 'मुक्त व्यापाराचे अमेरिकी तत्त्वज्ञान' हा लेख पाहावा.) जागतिक व्यापार संघटनेच्या सिएटल येथील परिषदेच्या वेळी अमेरिकेतील विविध संघटनांनी मुक्त जागतिक व्यापाराच्या विरोधात केलेली निदर्शने आपल्याला माहिती आहेतच. एकंदरीत विचार करता अमेरिकेच्या धोरणांचा जो काही फायदा अमेरिकेला झाला, तो इतर देशांना, तीच (अमेरिकेचीच) धोरणे स्वीकारून होईलच असे नाही. त्या त्या वेळची, त्या त्या देशाची आर्थिक गरज व परिस्थिती आणि जागतिक अर्थकारणाची परिस्थिती याचा विचार करुन इतर राष्ट्रांनी धोरणे ठरविली पाहिजेत.

**अमेरिकेत नोकऱ्यांमधील असुरक्षितता वाढली**

अमेरिकेच्या धोरणांचे उदाहरण विविध आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे नेहमीच इतर राष्ट्रांसमोर ठेवण्यात येते. या धोरणांचा पाठपुरावा करण्यामागे जी गृहीततत्त्वे आहेत, त्यांबाबतचे विश्लेषण ऑक्सफर्ड विद्यापीठातील राजकीय विषयांवरील तज्ज्ञ, प्रोफेसर जॉन ग्रे यांनी 'फॉल्स डॉन - द डिल्यूझन्स ऑफ

ग्लोबल कॅपिटॅलिझम' या पुस्तकात केले आहे. ते म्हणतात की, 'खुल्या व बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेचा एक सर्वत्र होणारा / जाणविणारा परिणाम म्हणजे असुरक्षिततेचे राजकारण होय. याची सामाजिक किंमत फार मोठी असते. एकीकडे लोकशाहीच्या सर्व व्यवस्थांचे / नियमांचे पालन करीत, दुसरीकडे मुक्त व्यापाराचे धोरण राबवायचे ही एक अशक्य बाब आहे. जागतिक व्यापार संघटना मुक्त जागतिक व्यापाराचा जयघोष करते, पण 'मुक्त व्यापार म्हणजे नेमके काय?' हे ठरविण्याच्या प्रत्येक सरकारच्या अधिकारावर मात्र गदा आणते, या विरोधाभासाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

अमेरिकेच्या आर्थिक धोरणांमुळे तिथे मध्यमवर्गीयांमध्ये नोकऱ्यांबाबत असुरक्षिततेचे वातावरण मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले असून या नागरिकांकडे स्थावर मालमत्ता नाही. कामगारांना कल्याणकारी सोयी-सवलतींचा पाठिंबा नाही. अमेरिकेतील 'अमेरिकन नागरिकांच्या' रोजगारात मोठी वाढ झालेली नाही. याचा सामाजिक परिणाम म्हणजे, विविध कारणांसाठी एकदा तरी तुरुंगात जावे लागणाऱ्या अमेरिकन नागरिकांच्या संख्येत गेल्या काही वर्षात लक्षणीय वाढ झाली आहे, हे ही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. अमेरिकेत श्रीमंत `अधिक श्रीमंत' झाले व सर्वसामान्य मध्यमवर्गीय अमेरिकन आर्थिकदृष्ट्या होता तिथेच आहे किंवा त्याची मिळकत कमीच झाली आहे, म्हणूनच अमेरिकेच्या आर्थिक धोरणांचे उदाहरण 'आदर्श' म्हणून इतर राष्ट्रांनी स्वीकारायचे कारण नाही, अशा निष्कर्षाप्रत ते आले आहेत.

**धोक्याचा इशारा**

अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची आतापर्यंतची तेजीची एकूण वाटचाल १९२० च्या दशकात आलेल्या तेजीप्रमाणे आहे, असे अर्थतज्ज्ञांना वाटते. त्यानंतर अमेरिकेत फार मोठी मंदी आली होती. म्हणूनच पुन्हा एकदा अमेरिकेला मोठ्या मंदीला सामोरे जावे लागण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. उच्च तंत्रज्ञानावर आधारित असलेली आजची अर्थ व उद्योगव्यवस्था एका अर्थाने अतिशय नाजूक आहे. तंत्रज्ञान फार पटापट जुने होत आहे. परकीय गुंतवणूक व कर्जाच्या वाढत्या मर्यादा आणि मध्यमवर्गीय ग्राहकांच्या व मिळकतीसंबंधीची असुरक्षितता, यामुळे अर्थव्यवस्था एका ठिकाणी अडकून तिथूनच घसरण सुरू होईल व ती मोठ्या मंदीची सुरुवात असेल, असे मत माईकेल मँडेल या अमेरिकेतील अर्थविषयक संपादकांनी व्यक्त केले आहे.१९२० च्या दशकात ऑटोमोबाईल क्षेत्राचे वर्चस्व अर्थव्यवस्थेवर व उद्योगजगतावर प्रस्थापित झाले होते; तर आता विसाव्या शतकाअखेरीस ती जागा इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राने घेतली आहे. 'इतिहासाची

पुनरावृत्ती होते' यावर जर आपण विश्वास ठेवणार असू, तर १९२० च्या दशकातील मंदी येण्याआधीची स्थिती आता परत आल्याचे कॅलिफोर्निया विद्यापीठातील अर्थतज्ज्ञ बॅरी इचेनग्रीन यांनी म्हटले आहे.

विसाव्या शतकाअखेरीची आर्थिक उलाढाल ही 'माहिती आणि तंत्रज्ञानाच्या' क्षेत्राने व्यापलेली आहे. भांडवली बाजाराचा अर्ध्यापेक्षा जास्त हिस्सा माहिती-तंत्रज्ञानाशी संबंधित साधनांवर खर्च होतो. या तंत्रज्ञानावरील खर्च १९९७ मध्ये ११ टक्के, १९९८ मध्ये १३ टक्के, व १९९९ मध्ये १६ टक्के एवढा होता. त्यामुळे शेअर बाजारातील याच कंपन्यांच्या शेअर्सचे भाव वाढते राहिले. इतर कंपन्यांचे शेअर्सचे दर स्थिर राहिले. माहिती-तंत्रज्ञानासंबंधीचा वाढीचा दर सतत वाढता ठेवणे भविष्यात शक्य होईलच असे नाही. त्यामुळे या दरात जरी हळूहळू घसरण झाली; उदाहरणार्थ १९९९ मधील १६ टक्क्यांवरून तो पुन्हा ११ टक्क्यांवर आला, तरी शेअर बाजारातील या कंपन्यांचे दर कोसळतील व याचा परिणाम इतर कंपन्यांवरही होऊ शकेल. अर्थात शेअर बाजारातील घसरणीमुळे मंदी येईल असे नाही. पण याचा परिणाम ग्राहकांच्या मिळकतीवर दिसेल. आतापर्यंत विविध उद्योगांमध्ये दीर्घकाळ सेवा केलेल्या कामगारांना पटकन नोकरीवरून काढण्यात येत नव्हते. तसेच शेअर बाजारातील नफ्या-तोट्याच्या गणितावर त्यांचे वेतन कमी-जास्त होत नव्हते. पण आता ही परिस्थिती बदलली असून कामगारांचे वेतन बाजारातील व अर्थव्यवस्थेतील चढ-उताराशी जोडले जात आहे. यामुळे सध्या तात्पुरत्या कामगारांना जास्त मागणी आहे. अमेरिकेतील सध्याच्या कामगारांपैकी सुमारे ३ टक्के कामगार (तीस लाख) `तात्पुरते कामगार' आहेत. याशिवाय १० टक्के कामगारांना कंपन्यांनी थेट हंगामी म्हणून नियुक्त केले आहे. या परिस्थितीमुळे सध्या कामगारांमध्ये कर्ज घेण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

शेअर बाजारावर व एकूण अर्थव्यवस्थेवर थोडाफार विपरित परिणाम जरी झाला तरी ग्राहकांची क्रयशक्ती अत्यल्प झालेली असेल, त्यांची मिळकत अस्थिर असेल व कर्ज फेडण्याची शक्यता दुरावलेली असेल. म्हणजेच अशा प्रकारे मंदी येऊ शकते असे मँडेल यांनी म्हटले आहे. तंत्रज्ञानाधारित मंदी आतापर्यंत एकाही अर्थव्यवस्थेने बघितलेली नाही. त्यामुळे अमेरिकेचे 'फेडरल रिझर्व्ह बोर्ड' व अमेरिकेचे सरकार यांना कशी धोरणे स्वीकारावी लागतील ते काळच ठरवेल. अमेरिकेतील निवडणुकानंतर (सन २००० च्या अखेरीस) कोणतेही (रिपब्लिकन वा डेमोक्रॅट्स) सरकार सत्तेवर आले तरी या परिस्थितीत फारसा बदल होईल असे अर्थतज्ज्ञांना वाटत नाही. ■■

पर्यायी विकास

# जागतिकीकरणाकडून पर्यायी व्यवस्थेकडे

आज अनेक क्षेत्रात जागतिकीकरण या शब्दाला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले दिसते. जागतिकीकरण होणे अटळ व आवश्यक आहे आणि ते कायमस्वरुपी टिकेल असे अनेकांना वाटते. तसेच जागतिकीकरणासाठी कारणीभूत ठरत असलेल्या आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रक्रिया रोखणे शक्य व व्यवहार्य नाही, अशीही धारणा समाजात आहे. पण जागतिकीकरणाच्या विरोधात लोकशाहीच्या तत्त्वांना अनुसरुन कृती केली तर जागतिकीकरणाच्या समर्थक असणाऱ्या मोठ्या संस्थांना व संघटनांना लोकभावनांची कदर करावी लागते, हे जागतिक व्यापार संघटनेच्या सिएटल येथील परिषदेच्या वेळी करण्यात आलेल्या निदर्शनांवरुन स्पष्ट झाले आहे.

मुक्त जागतिक व्यापाराला आणि अमेरिका व काही प्रगत राष्ट्रांचा वरचष्मा असणाऱ्या जागतिक व्यापार संघटनेच्या विषमता निर्माण करणाऱ्या धोरणांना, संपूर्ण जगातील अनेक संघटना, संस्था यांनी विरोध केला व ती धोरणे तात्पुरती का होईना मागे घ्यायला लावली आहेत. (या संबंधीचा सविस्तर लेख अर्थबोधपत्रिका अंक ८, पान क्र.२८ वर देण्यात आला आहे.) ज्या ज्या संस्था,संघटना, व्यक्ती यांनी हा विरोध केला त्यांच्या मते, हा विरोध केवळ तात्कालिक स्वरूपाचा नव्हता. किंबहुना विरोधाची ती एक सुरुवात होती. आर्थिक विषमतेकडे झुकणारी जागतिकीकरणाची वाटचाल रोखण्यासाठी त्याला पर्याय शोधून त्या दिशेने जगाने जावे, यासाठी हे विरोधक प्रयत्न करीत आहेत, असा त्यांचा दावा आहे. या संदर्भात 'द इकॉलॉजिस्ट' (जाने-फेब्रु - २०००) मध्ये काही माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. याशिवाय इंटरनेटवरूनही काही माहिती उपलब्ध झाली आहे. जागतिक व्यापार संघटनेची पुढील बैठक जीनिव्हा येथे २००१ मध्ये होणार असून त्यापूर्वी विरोध करणाऱ्यांनी हे पर्याय जनतेसमोर विविध माध्यमांद्वारे यावेत असा प्रयत्न सुरु केला आहे. हे पर्याय विचारमंथनासाठी अर्थबोधपत्रिकेत मांडण्यात आले आहेत.

जागतिकीकरणावर अभ्यास करण्यासाठी 'इंटरनॅशनल फोरम ऑन ग्लोबलायझेशन' (आय. एफ. जी.) या मंचाची स्थापना १९९४ मध्ये झाली.

स्थापनेपासूनच या मंचाला सर्व राष्ट्रांमध्ये एकाच प्रश्नाला सतत सामोरे जावे लागत होते. तो प्रश्न म्हणजे जागतिक व्यापार संघटनेला व जागतिकीकरणाला जर मंचाचा विरोध असेल, तर मंचाचे या संदर्भातले पर्याय कोणते ? या प्रश्नावर उत्तर शोधण्यासाठी १९९९ च्या जूनमध्ये वॉशिंग्टन येथे जगभरातील अनेक राष्ट्रांमधील संबंधित तज्ज्ञांची तीन दिवसीय चर्चा झाली. त्यावेळी आठ तत्त्वांच्या आधारे जागतिकीकरणाला विरोध करावा असे ठरवण्यात आले. ही तत्त्वे अशी -

**१) लोकशाही व सार्वभौमता** - जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्या आर्थिक महासत्ता ठरतात. राष्ट्राराष्ट्रांमधील सरकारे ही बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातातील खेळणे बनतात. म्हणून लोकशाही टिकविणे व लोकांचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य कायम राखणे यासाठी नागरिकांना जागरूक करून, सरकारवर दबाव आणून सरकारला नागरिकांच्या, देशाच्या हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडणे.

**२)स्थानिकतेला प्राधान्य** - विविध वस्तू तयार करतांना उत्पादनप्रक्रियांपासून विक्रीप्रक्रियेपर्यंतच्या सर्व प्रकारच्या गरजांमध्ये स्थानिकतेला प्राधान्य देण्यात यावे. जेथे जे जे उपलब्ध आहे, त्यातून नागरिकांनी दैनंदिन गरजा भागवणे, हे महत्त्वाचे ठरेल. स्वयंपूर्ण खेडी, गावे, शहरे व राष्ट्रे असा हा क्रम असावा. आत्मनिर्भरता व कृत्रिम गरज (जी बहुराष्ट्रीय कंपन्या जाहिरातीद्वारे निर्माण करतात, असे विरोधक म्हणतात) यातील फरक जाणणे, उपयुक्त ठरेल. एका अर्थाने हे स्वदेशीकडे झुकणारे तत्त्व आहे.

**३) परिसरविज्ञानात सातत्य राखणे** - निसर्गाची मूळ रचना चक्राकार आहे, त्यात एका साखळीत सर्व घटक सामावले आहेत, याची जाण ठेवून विविध वस्तूंची निर्मिती करणे. 'केवळ आर्थिक नफा' हे उद्दिष्ट बाजूला ठेवून पर्यावरणीय दृष्टिकोणाचे भान राखणे (या संबंधीचा सविस्तर लेख 'परिस्थितीविज्ञान साक्षरता' अर्थबोधपत्रिका अंक ९मध्ये पान क्र. १२ वर देण्यात आला आहे.)

**४) आर्थिक मानवाधिकार** - जगातील प्रत्येक नागरिकाची अन्न, वस्त्र, निवारा व आरोग्य या मूलभूत गरजांची पूर्तता व्हावी या उद्दिष्टाने व्यापार व गुंतवणूक व्हावी.

**५) अन्नधान्यविषयक सुरक्षितता** - ज्या जमिनीत जे पिकते ते स्थानिक नागरिकांनी खाणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य असते. रासायनिक खते व जैवतंत्रज्ञान वापरून तयार केलेले अन्नधान्य वापरण्यावर बंदी घालावी,हे शक्य

होत नसेल तर त्यावर काही मर्यादा असाव्यात. मोठ्या कंपन्या उत्पादन वाढवितांना रासायनिक खते वापरुन शेतीयोग्य जमीन नष्ट करतात. यामुळे लहान शेतकऱ्यांचे व स्थानिक अर्थव्यवस्थेचे नुकसान होते, हे टाळण्यासाठी प्रयत्न करणे.

**६) काही खास वस्तूंच्या व्यापारावर बंदी** - काही वैशिष्ट्यपूर्ण स्थानिक वस्तूंची, सेवांची, वनस्पतींची खरेदी-विक्री यावर आणि अपायकारक वस्तूंच्या व्यापारावरही बंदी घालणे जरूरीचे आहे. विकसित राष्ट्रे आपल्या औद्योगिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा विकसनशील राष्ट्रांकडे निर्यात करतात. या प्रक्रियेत विकसनशील राष्ट्रांच्या पर्यावरणाचे नुकसान होते, असे म्हटले जाते, अर्थात हे एक उदाहरण झाले. दुसरे उदाहरण आहे कॅनडाचे. कॅनडातील मुबलक पाण्याचा साठा लक्षात घेऊन तेथे पाण्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. नैसर्गिक साठे अशा व्यापारातून संपले तर कॅनडालाच पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल. तेव्हा अशा जागतिक व्यापारावर बंदी आणावी.

**७) समानता** - जगातील सर्व नागरिक समान आहेत व प्रत्येकाचा समान विकास व्हावा या तत्त्वावर आधारित व्यापार व्हावा. गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील दरी रुंदावली तर युध्दाची शक्यता वाढण्याचीच भीती आहे.

**८) सांस्कृतिक, जैविक, आर्थिक व सामाजिक विविधतेला महत्त्व** - प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रापेक्षा अनेक बाबतीत वेगळे असते. ही विविधता कायम न राखता, केवळ आर्थिक व व्यापारी हेतूने एकच संस्कृती जगभर लादण्याचा प्रयत्न बहुराष्ट्रीय कंपन्यांनी किंवा जागतिक व्यापार संघटनांनी केला, तर त्यातूनही संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वाढते. हे वैविध्य कायम राखून सर्वांची सारखी प्रगती होणे हे महत्त्वाचे आहे.

## आंतरराष्ट्रीयवाद

या तत्त्वांच्या आधारावर जागतिकीकरणाचे विरोधक 'आंतरराष्ट्रीयवाद' (Internationalism) ही भूमिका घेतात. जागतिकीकरण व आंतरराष्ट्रीयवाद ह्या दोन पूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत असे ते म्हणतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्थांनी जागतिक पातळीवर कोणते कार्य करावे, याबद्दलही त्यांच्या काही अपेक्षा आहेत. एकीकडे संपूर्ण जगासाठी आर्थिक, सामाजिक समतेचा आग्रह धरण्याची गरज आहे, तर दुसरीकडे निर्णयप्रक्रियेचे आधिकार स्थानिक जनतेकडे सोपविण्याचीही गरज आहे. जागतिकीकरणाऐवजी स्थानिकीकरणाकडे अशी निर्णयप्रक्रियेची वाटचाल, स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक या मार्गाने होण्याची गरज आहे . म्हणूनच जागतिक किंवा आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत व

सहकार्यही अपरिहार्य ठरणार आहे, असे ह्या मंचाला वाटते. तेव्हा, व्यापक दृष्टिकोणातून अशा आंतरराष्ट्रीय संस्थांनी सर्व राष्ट्रांना आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, राष्ट्राराष्ट्रांमधील शांतता व सलोखा कायम राखावा, पर्यावरणाचे नुकसान टाळावे, आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झालेले हक्क व आधिकार सर्वांपर्यंत पोचवावे अशा अपेक्षा मंचाने व्यक्त केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय श्रम (कामगार) संघटना, संयुक्त राष्ट्र संघ यांच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आलेल्या संघटना व इतर जागतिक संस्थांनी या कामी मदत करावी, खरे तर अशा संघटना कार्यरत आहेतही व त्या बळकट होणे ही आजची गरज आहे. संयुक्त राष्ट्र संघासारख्या अनेक संस्थांचे कार्य व आधिकार वाढले, तरच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक व जागतिक व्यापार संघटना यांची गुंतवणूक, उत्पादन व व्यापार या क्षेत्रांतील मक्तेदारी कमी होईल. जगावर मक्तेदारी गाजवून, आर्थिक विषमता वाढविणाऱ्या या संघटनांवर दबाव आणून त्यांनी आपला दृष्टिकोण, उद्दिष्ट व कार्यपध्दती बदलावी यासाठी आज नागरिकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. सिएटल येथील जागतिक व्यापार संघटनेची बैठक नागरिकांनी केलेल्या अशा विरोधातूनच अपयशी ठरली ही एक चांगली सुरुवात झाली आहे. फक्त आता येथे थांबणे योग्य होणार नाही. म्हणून आता जागतिक अर्थव्यवस्थेची दिशा बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी मंचातर्फे खालील पाच मार्ग सुचविण्यात आले आहेत.

१) अर्थव्यवस्थेची निव्वळ व्यापारी नफ्याकडे झुकणारी दिशा बदलण्यासाठी गुंतवणुकीची दिशा बदलण्यात यावी, दीर्घकालीन गुंतवणूक अशी ही दिशा असावी, आणि यात स्थानिक उत्पादनांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात यावे. गरिबी दूर व्हावी, उत्पादन प्रक्रियेत अनेकांचा सहभाग वाढावा, पर्यावरणाचा ऱ्हास न होता आर्थिक प्रगती व्हावी, अशी उद्दिष्टे असावी.

२) जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरता दूर करण्यासाठी नवे नियम करण्यात यावेत. जागतिक अर्थसंस्थांनी त्याबाबत विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

३) सध्याच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्र व सरकारांचे महत्त्व कमी करण्यात येत आहे, याउलट नव्या अर्थव्यवस्थेत निर्णयप्रक्रिया ही स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक अशी असावी.

४) खाजगी नुकसान हे खाजगीच असले पाहिजे. सरकारने या संदर्भातील कोणतीही जबाबदारी स्वीकारु नये.

५) खाजगी गुंतवणूक आणि सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक यातील असमानता

दूर केली पाहिजे. निव्वळ नफ्याच्या उद्दिष्टाने करण्यात येणाऱ्या खाजगी गुंतवणूकीवर मर्यादा ठेवतांना, दुसरीकडे पर्यायी उद्दिष्ट पूर्ण करू पाहणाऱ्या सार्वजनिक गुंतवणूकीला प्रोत्साहन दिले पाहिजे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक पातळीवर अशा वेगवेगळ्या उपाययोजना करून, जागतिकीकरणाला दूर ठेवून, पण आंतरराष्ट्रीय सहकार्याने पर्यायी अर्थव्यवस्थेकडे वाटचाल चालू ठेवली तर विनाशाकडे जाणाऱ्या जगाला नक्कीच वाचविता येईल, असा आशावाद मंचाने व्यक्त केला आहे. नागरिकांनी या दृष्टीने विचार व कृती करावी अशी त्यांची अपेक्षा आहे. ■■

*जागतिकीकरणामुळे व खुल्या आर्थिक धोरणांमुळे वेगवेगळ्या राष्ट्रांमधील नागरिकांसाठी वेगवेगळ्या संधी उपलब्ध होत आहेत. या अर्थव्यवस्थेत काही मोजक्या राष्ट्रांचा फायदा झाला असला तरी व्यापार, गुंतवणूक व नवे तंत्रज्ञान सर्वदूर पोचून, त्याचे फायदे आधिकाधिक राष्ट्रांपर्यंत पोचावेत असे घडलेले नाही. उलट या जागतिक संधीपासून गरीब व अविकसित राष्ट्रे वंचितच राहिली आहेत. जागतिकीकरणामुळे गरीब व श्रीमंत राष्ट्रे यांच्यात आर्थिक समानता प्रस्थापित न होता उलट विषमताच जास्त वाढली आहे. व्यापार, परकीय गुंतवणूक व नवे तंत्रज्ञान याबाबतची देशादेशांमधील आकडेवारी हेच दर्शविते.*

***व्यापार*** *- विविध वस्तू व सेवा यांच्यातील जागतिक निर्यात १९९० ते १९९८ या काळात ४७ हजार अब्ज डॉलर्स यावरून ७५ हजार अब्ज डॉलर्स एवढी वाढली. पण या निर्यातीत अविकसित राष्ट्रांचा वाटा अत्यल्प किंवा नगण्य होता. अविकसित राष्ट्रांकडून होणाऱ्या निर्यातीत १९८० मध्ये ०.६ टक्के, १९९० मध्ये ०.५ टक्के व १९९८ मध्ये ०.४ टक्के अशी घसरणच झाली आहे.*

***परकीय गुंतवणूक*** *- १९९८ मध्ये परकीय गुंतवणूक ६० हजार कोटी डॉलर्स पर्यंत पोचली तरी, यापैकी ८३ टक्के गुंतवणूक केवळ वीस देशांमध्ये झाली होती. उरलेली म्हणजे फक्त १७ टक्के परकीय गुंतवणूक अविकसित राष्ट्रांमध्ये करण्यात आली होती. सर्वात मागासलेली समजली जाणारी अशी ४८ राष्ट्रे असून त्या देशांमध्ये यापैकी फक्त ०.४ टक्के परकीय गुंतवणूक करण्यात आली होती.*

***माहितीचे नवे तंत्रज्ञान*** *- संगणक व इंटरनेट वापरणा-या व्यक्तींच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून १९९५ मध्ये १.६ कोटी व्यक्ती इंटरनेट वापरत होत्या, तर सन २०००च्या अखेरीस ही संख्या ३०.४ कोटी एवढी वाढण्याची* शक्यता आहे. मात्र १९९८मध्ये अविकसित राष्ट्रांमध्ये इंटरनेट वापरणा-या व्यक्तींची संख्या लॅटिन अमेरिका ०.८ टक्के, सबसहारन अफ्रिका ०.१ टक्का आणि द.आशिया ०.०४ *टक्के इतकी कमी होती. यात वाढ झाली तरी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत ती संख्या कमीच राहील.*

*(संदर्भ : ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्ट - २०००)*

# विकासासाठी हवे स्थानिक 'स्व'राज्य

'लोकशाही ख-या अर्थाने राबवायची असेल तर शिक्षण सर्वांपर्यंत पोचले पाहिजे, कारण साक्षर जनताच आपल्या हक्कांबाबत जागरुक राहून विकास घडवून आणू शकते', या विधानाला पुष्टी देणारी घटना नुकतीच केरळमध्ये घडली आहे. लोकशाहीतील दबावगटांचे महत्त्व या निमित्ताने पुन्हा एकदा समोर आले आहे*.

केरळमध्ये साक्षरतेचा** प्रसार झाल्यानंतर १९७५ ते १९९५ या काळात तेथील जनता लिहू, वाचू लागली, विचार करू लागली. विचारप्रक्रियेतून हळूहळू नागरिक आपल्या परिस्थितीचा अभ्यास करु लागले. आपल्याला विकास करायचा असेल तर स्वयंनिर्णय व स्वयंप्रशासन या मार्गानेच तो लवकर करता येईल या निर्णयावर ते आले. यातून संघटित लोकशक्ती आकाराला आली. सरकारवर दबाव आणता येईल एवढी ती व्यापक व बळकट झाली.

**दबावगटाने घडविले विकेंद्रीकरण**

दरम्यानच्या काळात १९९६ मध्ये केरळमध्ये डाव्या लोकशाही आघाडीचे सरकार सत्तारुढ झाले होते. ग्रामस्वराज्याच्या कल्पनेने झपाटलेल्या संघटित लोकशक्तीने आपल्या मागण्या या सरकारपुढे मांडल्या व नेटाने त्यांचा पाठपुरावा केला. राजकीय अस्तित्वाचाच प्रश्न झाल्यानंतर राज्यशासनाने जनतेला स्वयंनिर्णयाचे आधिकार दिले तसेच स्वयंप्रशासनाचेही. पण लोकशाहीत विकासाच्या योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे ही देखील शासनाची जबाबदारी ठरते. त्यामुळे शासनाने निधीही उपलब्ध करून दिला. हे केवळ कागदोपत्री घडले नाही, हे महत्त्वाचे. यासाठी राज्यशासनाला अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये (Acts) , नियमांमध्ये ३८ दुरुस्त्या कराव्या लागल्या.

---

* 'लोकशाही आणि दबावगट' या विषयावरील एक लेख अर्थबोधपत्रिकेच्या अंक ८ मध्ये पान क्र. १९ वर प्रसिध्द करण्यात आला आहे.

** केरळ राज्यात सर्वाधिक साक्षरता आहे.

त्यानंतर अंमलबजावणीसाठी राज्य प्रशासन सुधारणा समितीला प्रतिवर्षी सुमारे ७० आदेश काढावे लागत आहेत. या संघटित लोकशक्तीमध्ये काही विचारवंत, शैक्षणिक तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिकांचा (कोळी व इतर काही जमातीतील व्यक्ती )मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. अनेकदा राजकीय स्वार्थासाठी ही लोकशाही मोडून काढण्याचा प्रयत्न झाला, नोकरशाहीचे त्रासही सहन करावे लागले पण ही लोकशक्ती थांबली नाही, मोडली नाही. शेवटी राज्यशासनाने पंचायत राज कायद्यात सुधारणा सुचविण्यासाठी सत्यव्रत सेन समितीची नियुक्ती केली. या समितीने विकेंद्रीकरणासाठी स्वायत्तता, विविध प्रक्रियांचे सुलभीकरण, भूमिकेत स्पष्टता, एकसमानता, लोकांचा सहभाग, जबाबदारीची जाणीव आणि दैनंदिन कामात पारदर्शकता या तत्त्वांचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे असे सुचविले.

विकेंद्रीकरणाच्या सुरूवातीस पहिल्या वर्षी पंचायतींनी आपापले निर्णय घेऊन योजना आखाव्यात, त्याचे अंदाजपत्रक तयार करावे आणि अंमलबजावणी करावी असे ठरविण्यात आले. १९९७ पासून पंचायतींना राज्य शासनाकडून देणाऱ्या निधीत हळूहळू वाढ करण्यात आली. नवव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत राज्य शासनाच्या तिजोरीतील ३७ टक्के निधी पंचायतींना विविध कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात आला. यापूर्वी तो फक्त ९% एवढा होता. विकेंद्रीकरणामुळे व राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याने ग्रामसभांचे पुनरुज्जीवन झाले, स्थानिक नागरिकांचा विकासप्रक्रियेतील सहभाग हळूहळू वाढू लागला. ग्रामसभांच्या चर्चांमध्ये सुमारे अडीच लाख नागरिक सहभागी झाले असावेत असे आढळून आले.

दुसऱ्या टप्प्यात नैसर्गिकरीत्या उपलब्ध होणारी साधनसामग्री आणि मनुष्यबळाचा वापर यासंबंधी सर्वेक्षण करून विविध प्रकारच्या माहितीचे संकलन करण्यात आले. प्रत्येक पंचायतीचा असा स्वतंत्र माहितीअहवाल तयार करण्यात आला. या माहितीच्या आधारे अनेक ठिकाणी चर्चासत्रे आयोजित करण्यात आली, त्यातून विविध प्रकल्प राबविण्यासाठी विशिष्ट अशी कार्यदले (taskforce) स्थापन करण्यात आली. तंत्रज्ञानविषयक किंवा प्रशासनविषयक बाबींसाठी सेवानिवृत्त व इतर तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेण्यात आली. एक वेगळे संस्थात्मक प्रतिमान (मॉडेल) यातून तयार झाले. अनौपचारिक शिक्षणाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध पातळ्यांवर प्रशिक्षण योजना राबविण्यात आली. यात निवडून आलेले १५ हजार लोकप्रतिनिधी, २५ हजार अधिकारी

आणि ७५हजार स्वयंसेवी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण झाले. विकेंद्रीकरणाच्या या प्रयोगानंतर असे आढळून आले की सर्वसामान्यांच्या दैनंदिन राहणीमानात बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाली.

**आशादायक परिणाम**

विकासाचे नियोजन सर्वसामान्य नागरिक हाच केंद्रबिंदू ठेवून व नैसर्गिक समतोलाचा विचार करून करविण्यात आल्याने कृषीक्षेत्राचे व जलसंपत्तीचे व्यवस्थापन योग्य रीतीने झाले, १९९७-९८ मध्ये राज्यातील नागरिकांचा उत्पन्नाचा दर ४.९टक्के होता, तो १९९८-९९मध्ये ५.६ टक्के एवढा वाढला. १९९७-९८मध्ये कृषीक्षेत्राचा विकास दर ०.८ टक्के होता तो १९९८-९९ मध्ये ३.८२ टक्के एवढा वाढला. ज्या उपजाऊ जमिनी पडिक होत्या त्या बऱ्याच प्रमाणात लागवडीखाली आणण्यात आल्या. पालघाट भागातील दर हेक्टरी उत्पादनात १.६ टनापासून ३ टनापर्यंत वाढ झाली. कुठे पाण्याचे नवनवीन स्रोत निर्माण करण्यात तर कुठे जुन्या स्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यामुळे भर उन्हाळ्यात मे महिन्यातही अनेक छोट्या गावांमधील विहिरींना पाणी होते.

**समाजातील सर्व स्तरांतून कौतुक**

या सर्व प्रयोगांबद्दल समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्तींनी फार चांगली मते व्यक्त केली आहेत. इडुकी जिल्ह्यातील पोटामल पंचायतीतील गावामधील संपर्क नदीच्या प्रवाहामुळे खंडित झाला होता. नेहमीच नदी ओलांडून पलीकडे जाणे शक्य होत नसल्याने, या भागातील व्यवहारांना मोठी मर्यादा पडली होती पण विकेंद्रीकरणामुळे ग्रामपंचायतीला मिळालेले आधिकार व निधी यामुळे येथील ग्रामपंचायतीने प्रथम पूल बांधला व नंतर जलसंधारणाची अनेक कामे केली. याचा फायदा सर्वच स्थानिक नागरिकांना झाला. आज येथील जनतेच्या कामात व राहणीमानात चांगला बदल झाला आहे. थिरुवनंतपुरम जिल्ह्यातील **विथुरा ग्रामपंचायतीचे अध्यक्ष जी. अप्पुकुट्टन** यांनी 'स्वातंत्र्यानंतर ५० वर्षांनी आम्हाला लोकशाहीची फळे चाखायला मिळताहेत' अशी बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली. 'आमच्या ग्रामपंचायतीने निधी मिळाल्यावर लगेच घराच्या छपरांवरून वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविण्यावर भर दिला. त्यामुळे पाण्याचा प्रश्न लवकर सुटला', असे **ग्रामपंचायतीच्या पी. ए. एडवर्ड** या सदस्याने सांगितले. 'गेल्या काही वर्षात नोकरशाहीच्या प्रक्रियेत अडकल्याने येथिल विकास कामे ठप्प झाली होती. आता विकेंद्रीकरणामुळे कृषि व लघुउद्योग क्षेत्रात समाधानकारक बदल

घडून येत आहेत असे **राज्यनियोजन मंडळाचे एक सदस्य इ. एम. श्रीधरन्** यांनी म्हटले आहे. `ग्रामपंचायतींना आतापर्यंत फक्त घटनेने स्वयंनिर्णयाचा आधिकार दिला होता. पण निधीची उपलब्धता व व्यावहारिक प्रशासकीय आधिकार या दोन्हीमुळे ग्रामपंचायतींच्या कारभाराचे खऱ्या अर्थाने पुनरुज्जीवन झाले'असे एका **स्वंयसेवी संस्थेचे आधिकारी ए. बी. राजन** यांनी व्यक्त केले. सर्वात महत्त्वाची प्रतिक्रिया म्हणता येईल ती म्हणजे, पहिली पंचवार्षिक योजना आखण्यात, लिहिण्यात ज्यांचा पुढाकार होता ते **अर्थतज्ज्ञ के. एन. राज* यांची.** ते म्हणतात, "केरळमध्ये १९६० साली कृषीक्षेत्रात झालेल्या चळवळीनंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेली ही दुसरी चळवळ आहे." याचाच अर्थ ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला सर्वच स्तरांतील नागरिकांनी पाठिंबा दिला आहे, असा होतो. अर्थात केरळमधील नागरिकांची चळवळ ही कोणत्याही एका पक्षाची नव्हती, ती खऱ्या अर्थाने समाजातून उभी राहिली होती. त्यामागे एक अभ्यास होता, पूर्वनियोजन होते आणि म्हणूनच राज्यशासनावर दबाव आणण्याएवढी ती बळकट झाली होती. या अभ्यासाचा व पूर्वनियोजनाचा भाग म्हणून असलेली माहिती वाचणे उद्बोधक ठरेल.

**विकेंद्रीकरणासाठी प्रशासकीय पुनर्रचना पध्दती**

ग्रामसभा (ग्रामीण भाग) / नगरपालिका (शहरी भाग)- एक छोटेखानी नियोजन मंडळ, सर्व मतदार मंडळाचे सदस्य, नागरिकांच्या गरजांचा विचार व त्याप्रमाणे नियोजन, कृषि, पाटबंधारे, पिण्याचे पाणी यासारखे १४ विषयांच्याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, यातून प्रत्यक्ष क्षेत्रासाठी छोटेछोटे कृतीगट स्थापन करणे.

विकास मंडळ - वरील छोट्या छोट्या कृतीगटांमधून एक महिला व एक पुरुष अशा दोघांची निवड करून विकासमंडळाची स्थापना करणे, ग्रामसभेच्या प्राधान्यक्रमानुसार चर्चा करून विकास मंडळाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरविणे, यासाठी उपलब्ध निधीचा विचार करणे, सरकारी किंवा स्वयंसेवी संस्थांकडून तांत्रिक सहकार्य घेण्याची सुविधा. ग्रामपंचायत (ग्रामीण भाग) /नगरपालिका (शहरी भाग) - प्रत्येक वॉर्डमधून एकच प्रतिनिधी निवडून सर्व प्रस्तावांवर चर्चा वाद, व अंतिम निधीची मंजुरी. लाभार्थी समिती - ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या प्रस्तावांसंदर्भात प्रत्येकयोजनेतील लाभार्थी समितीची स्थापना ग्रामसभांमार्फत करण्यात येते. ही समिती योजनेची अंमलबजावणी करवून घेते, तसेच स्थानिकांचा सहभाग कुठे कुठे घ्यायचा ते ठरविते.

* श्री. राज हे भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या मंडळातील एक सदस्य आहेत.

साधनव्यक्ती - योजना नीट राबवली जावी, नियोजन योग्य रीतीने व्हावे यासाठी मदत करणे, ग्रामपंचायत, जिल्हा व राज्य अशा तीनही पातळीवर या व्यक्ती मदत करतात. शासकीय सेवानिवृत्त आधिकारी, स्वेच्छासंस्था, जागरुक नागरिकांचे प्रतिनिधी अशांचा यात सहभाग असतो.

विकेंद्रीकरणासाठी राज्यपातळीवरील समन्वय समिती - या समितीचे प्रमुख स्थानिक प्रशासकीय खाते सांभाळणारे मंत्री असतात. नियोजनाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर करणे, दर आठवड्याला यासंबधीच्या तक्रारी ऐकून त्यावर कृती करणे व ग्रामपंचायतीशी सतत संपर्क ठेवून कामाचा आढावा घेणे हे या समितीचे कार्य आहे.

राज्यप्रशासकीय सुधारणा समिती - सर्व प्रशासकीय बाजूंवर देखरेख ठेवण्याचे, विकेंद्रीकरण नीट रीतीने राबविले जाते किवा कसे यावर लक्ष ठेवण्याचे काम या समितीचे असून विकेंद्रीकरणासाठी या समितीने विविध कायद्यांमध्ये तीसपेक्षा जास्त सुधारणा करवून घेतल्या आहेत.

लोकयोजना विभाग - राज्य नियोजन मंडळाची एक शाखा असे याला म्हणता येईल. विकेंद्रीकरण योग्य पध्दतीने व्हावे, यासाठी नागरिकांना जागरुक करणे, पंचायती राज पध्दतीतील नागरिकांच्या आधिकाराची जाणीव त्यांना करून देणे व एकंदरीत धोरणात्मक बाजूंवर लक्ष ठेवणे असे काम या विभागातर्फे केले जाते.

**निधीची उपलब्धता**

(राज्यशासनाच्या अंदाजपत्रकात स्थानिक संस्थाच्या गरजा, योजनांना व धोरणांना महत्त्वाचे स्थान)

पंचायत - सर्व प्रकारच्या योजना, प्रस्ताव यावर अंतिम निर्णय घेऊन त्याच्या खर्चाचा आराखडा तयार करणे, हे नियोजन ऑक्टोबर महिन्यात सुरू करून ते लवकरात लवकर राज्य शासनाकडे पाठवायचे. म्हणजे मार्च महिन्यात राज्य शासनाचे अंदाजपत्रक मंजूर होते त्यावेळी त्यात या खर्चासाठी निधी बाजूला ठेवण्यात येतो.

राज्यशासन - विविध योजनांवरील खर्चाला मंजुरी देतांना राज्यशासन काही नियामकतत्त्वे आखून देते. कृषी, पाटबंधारे, झोपडपट्टीविकास व शहरातील पायाभूत सोयी-सुविधा यावर राज्यशासनाचा भर असतो. मंजूर झालेल्या निधीपैकी दहा टक्के रक्कम महिलांच्या विकासासाठी खर्च करायची असे बंधन राज्यसरकारने घातलेले असते. निधी देतांना ठराविक कामाबाबतची सर्व योजना (कागदोपत्री व प्रत्यक्ष बघून) समजून मगच देण्यात येतो.

राज्याचे अंदाजपत्रक - ग्रामपंचायतीच्या कारभारासाठी अंदाजपत्रकात ४० टक्के निधी राखून ठेवण्यात आला असतो. विधानसभेने मंजूर केल्यानंतरच तो स्थानिक संस्थांकडे पाठविण्यात येतो.

प्रत्यक्ष कार्यवाही - राज्यशासनाकडून ग्रामपंचायतीकडे व ग्रामपंचायतीकडून लाभार्थी मंडळाकडे निधी पाठवण्यात येतो. योजना राबविताना कामाची प्रगती पाहून त्याप्रमाणे, टप्याटप्याने हा निधी उपलब्ध करून देण्यात येतो. राज्यशासनाकडून मिळालेल्या निधीपैकी ७५ टक्के रक्कम खर्च करणे ग्रामपंचायतीला बंधनकारक आहे. दरवर्षी निधी मंजूर करताना, गेल्या वर्षी दिलेल्या निधीपैकी किती रक्कम योग्य रीतीने खर्च झाली याचा विचार करण्यात येतो. आधीचा उरलेला २५ टक्के निधी पुढील वर्षी वापरण्याची सोय आहे. विकेंद्रीकरणातून विकास साधण्याचे केरळमधील हे उदाहरण जागतिकीकरणाकडून स्थानिकतेकडे जाण्याचा संदेश तर देत नाही ना?

■■

**परिसरविज्ञान, आरोग्य व सामाजिक बदल**

*थिरुवनंतपुरम जिल्ह्यातील पोझीयूर येथे कोळी समाज बहुसंख्य. मासेमारी हाच त्यांचा पिढीजात उदरनिर्वाहाचा उद्योग. काही वर्षापूर्वी मासेमारी करण्यासाठी येथे मोठ्या बोटींना (ट्रॉलर्स) परवानगी देण्यात आली. या बोटींच्या तळाशी असलेल्या मोठ्या जाळ्यात मासे अडकत. त्यामुळे लहान मच्छीमारांचे रोजचे नुकसान होत असे. शेवटी कंटाळून कोळी समाजाने उदरनिर्वाहासाठी अवैध रीतीने दारुगुत्ते सुरू केले. सहज मिळणा-या या पैशामुळे सबंध कोळीसमाज यात ओढला गेला. स्थानिक माफियांचे संरक्षणही समाजाला मिळाले. अवैध दारुविक्री रोखणे कुणालाच शक्य होईना कारण त्यातून पोलीस व स्थानिक समाज यांच्यात हिंसाचार होत असे. स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत व स्थानिक चर्चच्या मदतीने हा प्रश्न हाताळण्यात आला. तेव्हा या कोळ्यांना उदरनिर्वाहासाठी दुसरा मार्ग नसल्याने ते यात अडकल्याचे आढळले. या कोळी समाजाला शासनातर्फे आर्थिक मदत करण्यात आली, त्यामुळे त्यांचा मासेमारीचा व्यवसाय पुन्हा एकदा उभा राहिला. मोठ्या बोटींमुळे होणारे सागरी नुकसान व पर्यावरणाची हानी तर थांबलीच. शिवाय अवैध दारुविक्रीही खूप कमी झाली. विकेंद्रीकरणातून ग्रामपंचायतीला मिळालेल्या आधिकारामुळे हे शक्य झाले.*

(संदर्भः 'डाऊन टु अर्थ ' १५ जुलै २०००.)

# जगात प्रथमच 'प्रोजेक्ट सीहॉर्स'

निसर्गाने प्रत्येक देशाला कशाची ना कशाची देणगी दिली आहे. निसर्गाचे संतुलन राखीत मानवाने उदरनिर्वाह केला तर त्याचेच भविष्य सुखावह होईल आणि भावी पिढ्यांच्या गरजा भागवण्याच्या शक्यता टिकून राहतील, हे आता एक वैज्ञानिक सत्य म्हणता येईल. पण निसर्गाकडून घेतांना कुठे थांबायचे, हे न कळल्यामुळे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होतात. आशियातील भारतासह काही देशांमध्ये असेच प्रश्न निर्माण झाले आहेत.

फिलीपिन्सला मोठा समुद्रकिनारा मिळालेला आहे. साहजिकच समुद्रकिना-यावरील नागरिकांचे मुख्य उदरनिर्वाहाचे साधन 'सागरी संपत्ती' हेच आहे. सीहॉर्स नावाचा मासा येथे मोठ्या प्रमाणावर आढळतो. या माशांना पकडून त्यांना जिवंत अथवा वाळवून त्यांची खरेदी-विक्री हा व्यवसाय येथे फार मोठ्या प्रमाणावर आढळतो. या माशांचे वैशिष्ट्य असे की हा खाण्यासाठी जास्त वापरण्यात येत नाही, पण त्यात असणा-या औषधी गुणधर्मामुळे आशियातील काही देशांमध्ये विशेषतः चीनमध्ये त्याला फार जास्त मागणी आहे. दमा, शारीरिक दौर्बल्य व इतर काही रोगांवर इलाज करण्यासाठी चीनमध्ये जी परंपरागत औषधे वापरली जातात त्यात सीहॉर्सचा वापर भरपूर प्रमाणात करण्यात येतो. चीनमध्ये सीहॉर्सची मागणी वाढतच असून सध्या ती संख्यात्मक दृष्टीने २० लाख (सीहॉर्स) एवढी झाली आहे. सीहॉर्सच्या आयात-निर्यातीत ४५ देश गुंतलेले असून सीहॉर्सच्या मागणीत दरवर्षी १० टक्के एवढ्या वेगाने वाढ होते आहे. त्यामुळे सीहॉर्सची संख्या मात्र झपाट्याने कमी होते आहे. त्यामुळे सीहॉर्स पकडून त्यावर उपजीविका करणारे कोळी मात्र फारच अडचणीत आले आहेत. या समाजाची अडचण ओळखून फिलीपिन्समधील 'हॅरीबोन फाउंडेशन' आणि मॉंट्रीयल (क्यूबेक) येथील मॅकगील विद्यापीठीतील जीवशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. ॲमांडा विन्सेंट यांनी त्यांना मदत करण्याचे ठरविले. त्यांनी समुद्रकिना-याजवळच्या एका खेड्यात याविषयी जागतिक पातळीवरील पहिलाच म्हणता येईल असा 'सीहॉर्स कॉन्झर्वेशन प्रोजेक्ट' हाती घेतला. या प्रकल्पाला 'इंटरनॅशनल डेव्हलपमेंट

रीसर्च कौन्सिल' (आय. डी. आर. सी.) आणि इतर काही संस्थांनी निधी उपलब्ध करुन दिला. या प्रकल्पांतर्गत प्रथम एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यात सागरी वनस्पतींचा, प्राण्यांचा अभ्यास करणारे तज्ज्ञ, चीनमधील औषध उत्पादक, फिलीपिन्समधील कोळ्यांचे प्रतिनिधी व इतर संबंधित अभ्यासक असे प्रथमच एकत्र एका व्यासपीठावर आले. समुद्रातील किती व कोणकोणते प्राणी व वनस्पती औषधोपयोगी आहेत हे निश्चित करण्यासाठी एक सविस्तर यादी तयार करण्यात आली. दक्षिण आफ्रिकेतील महिला प्रतिनिधीने यासंबंधी काही माहिती संकलित करुन ती ३८ भाषांमध्ये उपलब्ध करून दिली आहे. यामुळे ज्या वनस्पती व प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत त्यांना कायद्याने विशेष संरक्षण देऊन त्यांची संख्या वाढवण्यासाठी खास प्रयत्न करण्याचे ठरविण्यात आले आहे. या कार्यशाळेत सीहॉर्सवर व त्याच्या खरेदी-विक्रीवर सर्वंकष विचार करून काही निर्णय घेण्यात आले. त्याप्रमाणे सीहॉर्स ह्या उपयुक्त माशाची संख्या वाढवण्यासाठी मादी सीहॉर्समध्ये प्रजननक्षमता असतांना तिला पकडून ठार न करण्याचे ठरविण्यात आले. तसेच औषधे तयार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी देखील अशा जिवंत माद्यांना विकत घेऊ नये असा अलिखित नियम पाळण्याचे मान्य केले आहे.

या कार्यशाळेनंतर सीहॉर्स पकडणा-या कोळ्यांनाही आपले उदरनिर्वाहाचे साधन कायमचे संपू शकते याची जाणीव झाली. त्यामुळे ते देखील सीहॉर्स पकडतांना योग्य खबरदारी घेऊ लागले. समुद्रकिना-यावर कोणत्याही प्रकारच्या माशांचा अवैध व्यवहार होऊ नये यासाठी गस्त ठेवण्यात आली. याशिवाय इतरही काही उपाययोजना करण्यात आल्या. सीहॉर्स प्रकल्पामुळे स्थानिकांच्या उदरनिर्वाहाच्या साधनाचे अतिव्यापारीकरण रोखण्यात आले आणि समुद्रातील अन्नसाखळी, जैविक विविधता यांचेही संतुलन ठेवण्यात आले. समुद्रकिना-यावर असलेल्या एका छोट्या खेड्यातील या कार्यशाळेपासून स्फूर्ती घेऊन इतरत्रही अशी जागरूकता निर्माण करण्यात येत आहे. निसर्गाचे संतुलन कायम राखण्याचा, जैविक विविधता जपण्याचा, स्थानिकांच्या उपजिविकेचे साधन टिकवून जीवनसातत्य टिकवण्याच्या या प्रकल्पाचे आशियातील इतर देशांनी स्वागत केले आहे.

(संदर्भ: 'बेस्ट ऑफ रिपोर्टस्' इंटरनॅशनल डेव्हलपमेंट रिसर्च कौन्सिलच्या प्रकाशनातून.)

■■

# पहिलीपासून इंग्रजी

सामाजिक व शैक्षणिक दृष्टीने अतिशय दूरगामी बदल करणारा, महत्त्वाचा असा, पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने अलीकडेच घेतला आहे. निर्णयाचा सखोल विचार व्हावा, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, सामाजिक व शैक्षणिक विचारवंत यांची अभ्यासपूर्ण मते पुढे यावीत या दृष्टीने भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने १६ जुलै २००० रोजी, एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते. शासनाचा हा निर्णय जाहीर झाल्यापासून यासंदर्भात अनेक वृत्तपत्रांत, मासिकांत तज्ज्ञांचे, जागरुक नागरिकांचे लेख प्रसिध्द झाले. यापैकी उपलब्ध झालेल्या लेखांमधील काही मुद्यांचे संकलन करून एक टिपण संस्थेने चर्चेसाठी तयार केले होते. अर्थबोधपत्रिकेच्या वाचकांसाठी या टिपणातील काही मुद्दे येथे देत आहोत.

या विषयावर सर्वंकष चर्चा व्हावी यासाठी मुख्य विषयाचे भाषिक, शैक्षणिक व सामाजिक असे तीन भाग करण्यात आले होते. प्रत्येक भागावरील चर्चेसाठी दोन तासांचा अवधी देण्यात आला होता. प्रत्येक विषयातील तज्ज्ञ व्यक्तींना चर्चेसाठी निमंत्रण देण्यात आले होते. याशिवाय ह्या विषयात विशेष रस असणारे निवडक नागरिक व काही शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## भाषाविषयक मुद्दे (समर्थन)

१. मानसशास्त्रीयदृष्ट्या वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षापर्यंत मेंदूची जास्तीत जास्त वाढ होते. या वयातच मुलांना स्वभाषा व इंग्रजी लवकर येऊ शकेल. २. लहान वयात चार-पाच भाषा सहजतेने येऊ शकतात, असे भाषेविषयीचे संशोधन सांगते, त्यामुळे इंग्रजी शिकणे कठीण होणार नाही. ३. पाचवी वा आठवीपासून इंग्रजी शिकविल्याने आपल्या पिढीचे नुकसान झाले आहे, तसे पुढील पिढ्यांचे होऊ नये. ४. या निर्णयामुळे राज्यात ज्ञानाची वेगळी क्रांती घडेल. ५. इंग्रजी ही विज्ञानभाषा व ज्ञानभाषा असल्याने संगणकक्षेत्र राज्यात गतिमान करून राज्याचा विकास करण्यासाठी, पहिलीपासून इंग्रजीचे धोरण शासन राबवीत आहे. ६.इंग्रजी ही ज्ञानभाषा, आंतरराष्ट्रीय व्यवहारात संपर्काची भाषा झाली आहे, इंग्रजी येण्यामुळे विविध क्षेत्रात उदा. संगणक क्षेत्रात सहजपणे प्रवेश करता येतो.

७. इंग्रजी ही परकीय भाषा. तरीही आज भारतातील सर्व महत्त्वाचे आर्थिक व्यवहार इंग्रजीतून होतात. ८. आज चांगल्या पगाराच्या नोकरीसाठी, बुद्धिनिष्ठ कामासाठी इंग्रजी येणे ही एक महत्त्वाची बाब आहे. अगदी शेतीचे किंवा पर्यावरणाचे क्षेत्र घेतले तरी त्यातील नवे तंत्रज्ञान व विज्ञान समजून घेण्यासाठी इंग्रजीची गरज असते. या पार्श्वभूमीवर इंग्रजी शिकायचेच आहे, तर पहिलीपासून शिकले तर काय बिघडेल? उलट झाला तर फायदाच होईल.

**विरोध**

१. भाषा ही मूलतः वारंवार ऐकून, त्या शब्दांचा सतत वापर करून येत असते. मातृभाषा शिकण्याची प्रक्रिया अशीच असते. त्यामुळे कोणतेही व्याकरण माहिती नसताना, लिहिता-वाचता येत नसताना लहान मूल बोलावयास शिकते. इंग्रजी भाषा सक्तीची करून येईल का ? ती मुलांची सहज शिकण्याची भाषा कशी होईल? २. अनौपचारिकरीत्या, हसत खेळत इंग्रजी येण्यासाठी जे वातावरण लागते ते वातावरण बहुसंख्य मुलांच्या घरी नसताना केवळ शाळेतील काही तासिकांमधून त्या मुलांना भाषा येईल का? ३. मातृभाषा नीट समजणे ती लिहिता-वाचता येणे व त्या भाषेत विचार करून ते अभिव्यक्त करता येणे, याला भाषा येणे असे म्हणता येईल. एक भाषा नीट म्हणजे संपूर्णपणे आल्याशिवाय दुसरी भाषा शिकवू नये असे भाषातज्ज्ञ म्हणतात. ४. इंग्रजीतील काही शब्द मुलांना माहिती असतात याचा अर्थ, ती भाषा येत असते असे नाही. काही शब्द येणे आणि भाषा येणे यात खूपच फरक आहे. ५. काही इंग्रजी शब्द, जे मुलांना येतात ते मराठी भाषेत रुळलेले शब्द आहेत. (जसे मराठीत अरबी, फारशी शब्द रूळले आहेत) ते इंग्रजी शब्द आता मराठीच झाले आहेत. मुलांना ते 'इंग्रजी' म्हणून येत नसतात. ६. पाचवीपासून शिकून इंग्रजी येत नाही याचा अर्थ पहिलीपासून शिकून म्हणजे केवळ अधिक काळ शिकून इंग्रजी येईल असा नाही. तर भाषा शिकविण्याच्या पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे, असा त्याचा अर्थ होईल. ७.आज दहावी किंवा बारावीपर्यंतचे शिक्षण घेतलेला प्राथमिक शिक्षक जर पाच सहा दिवसांच्या प्रशिक्षणावर इंग्रजी शिकवू शकतो, म्हणजे ते इतके सोपे आहे तर मग पहिलीपासून इंग्रजीचा आग्रह कशाला?८. संगणकासाठी इंग्रजी आवश्यक आहेच काय ? शिवाय संगणक किंवा तत्सम क्षेत्रात ज्यांना जायचे नसेल त्यांनी इंग्रजी का शिकावे? ९. भाषा ही सतत वापरुन येते असे म्हटले जाते. आपल्या समाजात सतत वापरण्याच्या दृष्टिकोणातून इंग्रजी भाषा रूळलेली नाही, रूळेल असे वाटत नाही. तेव्हा इंग्रजी भाषा शिकविण्याचे प्रयोजन काय ?

याचा नीट विचार व्हावा. १०. कोणत्या पातळीवरील इंग्रजी भाषा यायला हवी हे आधी ठरविले पाहिजे. केवळ संपर्क भाषा म्हणून त्याचा उपयोग करणे अपेक्षित असेल तर साहित्य या अंगाने ती नाही शिकविली गेली तरी चालेल. ११. जशा इतर परकीय भाषा खाजगी संस्थांमधून लोक गरजेप्रमाणे शिकतात, त्याचप्रमाणे इंग्रजी शिकता येणार नाही का ? १२. इंग्रजी प्राथमिक शाळेत शिकविल्यामुळे मराठीकडे (मातृभाषेकडे) दुर्लक्ष होईल. १३. मातृभाषा नीट न आल्याने इंग्रजी किंवा अन्य भाषाही नीटपणे येणार नाहीत.

## सामाजिक / आर्थिक संदर्भातील मुद्दे (समर्थन)

१. जागतिकीकरणाच्या व आर्थिक उदारीकरणाच्या या प्रक्रियेत बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेला महत्त्व आले आहे. या नव्या अर्थव्यवस्थेत टिकून राहण्यासाठी व नव्या अर्थव्यवस्थेचे सर्व प्रकारचे फायदे मिळविण्यासाठी इंग्रजी येणे आवश्यक आहे. २. राज्याराज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने इंग्रजीचा स्वीकार केला नाही. म्हणून महाराष्ट्र मागे राहिले आहे. स्पर्धा परीक्षांमध्येही ते मागे पडते आहे. म्हणून पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याचा निर्णय योग्यच आहे. ३. नव्या अर्थव्यवस्थेमुळे खेडी ओस पडणे व शहरे वाढणे ही प्रक्रिया वेगाने होत आहे, होणार आहे. शहरांमध्ये ज्या ज्या सुखसोयी आहेत त्या छोट्या गावांत, खेड्यात याव्यात असे त्या छोट्या गावातील लोकांना वाटणे स्वाभाविक आहे. अशांचे पहिलीपासून इंग्रजीबाबत अनुकूल मत आहे. ४. इंग्रजी ही प्रभावशाली श्रीमंत व नवश्रीमंतांची मिरासदारी झाली आहे, त्यांचाच आज समाजावर दबाव आहे. या गटात आपल्याला किंवा आपल्या मुलाबाळांना प्रवेश मिळावा असे वाटत असेल तर इंग्रजीला पर्याय नाही अशी भावना समाजात तयार झाली आहे.

५. आज इंग्रजी येणाऱ्यांचा गट, इंग्रजी न येणाऱ्यांवर आर्थिक व सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात कुरघोडी करीत आहे. या कारणाने समाजातील सर्वच स्तरातील लोकांना इंग्रजी शिकण्याची प्रथमपासून संधी मिळाली पाहिजे. ६. ब्राह्मणी-वसाहतवादी वृत्तीचे लोकच या धोरणाला विरोध करीत आहेत. इंग्रजीचा विरोध हा 'उच्चभ्रूंचा कांगावा' आहे. इतरांना त्यांच्या बरोबरीला, त्यांच्या स्पर्धेत येऊ नये असे त्यांना वाटते. ७. 'पहिलीपासून इंग्रजी' हे 'इंग्रजीचे प्रस्थ माजवून नवी जातीव्यवस्था' जी निर्माण केली गेली आहे, ती मोडणारे क्रांतिकारक धोरण आहे. ८. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतरही नवविज्ञान, नवतंत्रज्ञान हे इंग्रजीशिवाय इतर भारतीय भाषांमधून पुरेसे उपलब्ध झाले नाही. उलट आर्थिक व्यवहारात व ज्ञानाच्या नवनवीन क्षेत्रात प्रवेश मिळविण्यासाठी

इंग्रजी शिकणेच क्रमप्राप्त झाले. ९. आज भारताची अशी एक भाषा - राष्ट्रभाषा नाही. हिन्दी ही नावापुरतीच राष्ट्रभाषा राहिली. दक्षिणेकडील राज्यांनी हिन्दीपेक्षा इंग्रजीलाच महत्त्व दिले. तेव्हा आज सुशिक्षित भारतीय एकमेकांशी संपर्कासाठी इंग्रजीतच बोलतात ही वस्तुस्थिती आहे. खरे तर सुरुवातीपासूनच इंग्रजीला संपर्क भाषा म्हणून मान्यता दिली असती आणि स्वातंत्र्यानंतर इंग्रजी व स्वभाषा या दोनही नीट शिकविल्या असत्या तर आज असे वादग्रस्त निर्णय घेण्याची वेळ सरकारवर आली नसती.

**विरोध**

१. समाजात इंग्रजीचे वातावरण सार्वत्रिक नाही, शहरातील काही गट सोडले तर बहुसंख्य पालकांना इंग्रजी वातावरण घरी उपलब्ध करणे शक्य होणार नाही. अनेक पालकांना दिवसाकाठी मुलांना काही तास सुद्धा देता येत नाहीत. त्यांना मुलांच्या अभ्यासासाठी वेळ नसतो. असे पालक मुलांच्या इंग्रजी शिकण्यासाठी वेगळे प्रयत्न करू शकतील असे वाटत नाही. २. आर्थिक-सामाजिक क्षेत्रात असे कोणते व्यवसाय आहेत की जे इंग्रजीशिवाय होऊच शकत नाहीत? हजारो खेड्यांमधील सर्वच दैनिक व्यवहार मराठीतच होतात. तेथे संपर्क भाषा म्हणूनही इंग्रजी गरजेची नाही. ३. प्रत्येक भाषेतील शब्दांना, वाक्यांना, म्हणींना विशिष्ट अर्थ अभिप्रेत असतो, तो त्या त्या काळातील घटनांशी परिस्थितीवर आधारित असतो. भाषा ही समाजजीवनाशी अतिशय निगडित असल्याने क्वचितप्रसंगी त्यात बदलही होत जातात. आपल्या समाजात इंग्रजी ही भाषा अशा अर्थाने रुळणार नाही. ४. समाजात २० टक्के लोक जी भाषा बोलतात त्यात ८० टक्के लोकांचे दैनंदिन व्यवहार सक्तीने करण्यापेक्षा जनसामान्यांच्या भाषेत इतर सर्व व्यवहार का करू नयेत ? ५. खेड्या-पाड्यांतील, छोट्या छोट्या गावातील सामाजिक वातावरण व शिक्षकांची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर शासनाने प्रशिक्षण दिले तरी शिक्षकांची भाषा शिकविण्याची गुणवत्ता चांगली असेल अशी खात्री नाही. त्यांना हवे ते वातावरण खेड्या-पाड्यांतून राहणार नाही. त्यामुळे अर्थातच इंग्रजीचा दर्जा अपेक्षेप्रमाणे राहणार नाही. ६. या धोरणामुळे बहुजनसमाजाचे भले होईल असा दावा केला जातो; पण प्रत्यक्षात त्यांचे नुकसानच होईल. कारण फक्त 'इंग्रजीचे' धोरण आणून एकूण शैक्षणिक वातावरण पुरविण्याकडे असलेले शासनाचे दुर्लक्ष लपविले जात आहे. ७. आज खेड्यांतून, आदिवासी भागांमधून शिक्षणाच्या दर्जाचाच गंभीर प्रश्न आहे. तसेच भटक्या-विमुक्तांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यायला हवे आहे. शाळेबाहेरील २५-३० लाख मुलांनाही शाळेत आणून

टिकती व शिकती करण्याचा प्रश्न आहे. हे अग्रक्रमाचे प्रश्न सोडविण्याचे धोरण आखण्याऐवजी पहिलीला इंग्रजी आणणे व त्यावर खर्च करणे सयुक्तिक नाही.

## शिक्षणविषयक मुद्दे (समर्थन)

१. प्राथमिक शिक्षणासाठी २ कोटी मुलांची नाव नोंदणी होते. पहिली ते चौथी असे सलग शिक्षण घेणारी अंदाजे १ कोटी मुले आहेत. शाळेचे शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या उरलेल्या मुलांना इंग्रजीची संधी आत्ताच दिली नाही तर त्यांना पुढे ही संधी मिळणार नाही. २. बालवयापासूनच इंग्रजी ऐकल्यामुळे - बोलल्यामुळे इंग्रजी बाबत भीती किंवा न्यूनगंड निर्माण होणार नाही. पाचवी पासून सुरू होणाऱ्या इंग्रजीला न घाबरता ती मुले पुढील शिक्षण घेतील. आपण संगणकयुगात टिकू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होईल. ३. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा थोड्याफार तरी रुंदावतील व त्यांना शिक्षणाची गोडी वाटेल. ४. शिकून काय होतय? नोकऱ्या कुठे मिळताहेत? अशी भूमिका असणारे आज अनेक आहेत. पण इंग्रजी आल्याने नोकरी मिळण्याच्या संधी वाढतात हे त्यांना पटेल व त्यांची भूमिका बदलेल.

५. या निर्णयामुळे इंग्रजी शिकविण्याचा दर्जा सुरूवातीच्या काळात खालावला तरी त्यात त्यात हळूहळू सुधारणा होईलच. किमान संपर्कासाठी इंग्रजी तर नक्कीच येईल. ६. आज शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होणे आवश्यक आहे त्याप्रमाणे इंग्रजीचे सार्वत्रिकीकरण होणेही अत्यावश्यक आहे. ७. लहान वयात भाषा लवकर शिकता येतात असे जर संशोधनाद्वारे सिद्ध झाले असेल तर वयाच्या ७ व्या, ८ व्या वर्षापर्यंत मुलांना केवळ भाषा शिकवाव्यात आणि गणित, व इतर विषय उशीरा शिकवावेत. ८. आजुबाजूला इंग्रजी शब्दांचे वातावरण आहेच. (दुकानाच्या पाट्याही इंग्रजीत असतात.) त्यामुळे पहिलीपासून इंग्रजी शिकणे अवघड नाही. ९. सर्वच शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी शिकविले तर समाजातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे वेड कमी होईल.

**विरोध**

१. भाषाशिक्षण हे मूलतः अनौपचारिक असते. औपचारिक व कृत्रिम प्रयत्नांनी भाषा ऐकताना-बोलताना लहान मुलांच्या मनावर ताण येण्याची शक्यता आहे. २.पहिलीचे वय हे विविध क्षमतांच्या विकासाचे वय असते. सर्व क्षमतांचा पुरेसा विकास झाल्याशिवाय परकीय भाषा शिकविण्याचा अट्टहास मुलांवर अन्याय्य शैक्षणिक ओझे लादेल. ३. मातृभाषा चांगली अवगत झाली

की जगातील कोणत्याही भाषा शिकता येतात. प्राथमिक शिक्षणाचे वय हे मातृभाषा चांगली शिकण्यासाठी उपयोगात आणायला हवे. अनेक भाषा शिकविण्यासाठी नाही. ४. आनंददायी शिक्षणाच्या कल्पनेपासून आपण अद्याप दूरच आहोत. मुलांना शाळेबद्दलचे आकर्षण आपण निर्माण करू शकलो नाही. सर्वांना प्राथमिक व व्यावहारिक शिक्षण देण्यात आपण अयशस्वी ठरलो असताना, इंग्रजीमुळे ही परिस्थिती आणखी बिघडेल असे वाटते. ५. शाळांतून अगोदरच गळतीचे प्रमाण मोठे आहे. शाळेपासून दूर पळू पाहणाऱ्या या मुलांना इंग्रजीसारख्या परभाषेमुळे शाळा आणखी लांबची वाटू शकते. परकीय भाषा शिकण्यासाठी तसे वातावरण असावे लागते. म्हणजे विद्यार्थ्यांना भाषा सतत ऐकण्याची सोय हवी, मग शाळेतील काही मिनिटांच्या तासिकांमध्ये असे भाषेचे वातावरण (लँग्वेज ग्रीनहाऊस) तयार होईल का ?

६. इंग्रजी भाषा ही कोणत्या स्तरावर येणे अपेक्षित आहे हे ठरविले पाहिजे. आणि केवळ संपर्क भाषा, व्यवहारोपयोगी भाषा आपण शिकणार असू तर ती पहिलीपासून कशाला ? ७. आजच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे इतर अनेक प्रश्न आहेत. नेमलेला अभ्यासक्रम (मातृभाषेतील) पूर्ण करण्याबाबत तिथे गोंधळ असतो. विद्यार्थ्यांची उपस्थिती यथातथाच असते. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व शिक्षकांची अध्यापनाची पद्धती यांचा मेळ नसतो. अशा वातावरणात सक्तीचे इंग्रजी शिकविणे हे शिक्षकांना व शिकणे हे विद्यार्थ्यांना 'भार' वाटण्याची शक्यता आहे. ८. पाचवीपासून इंग्रजी शिकून संभाषण कौशल्य येत नाही म्हणून पहिलीपासून इंग्रजी असे शासन म्हणते. आज जे शिक्षक मुलांना इंग्रजी शिकविणार आहेत ते पाचवीपासून इंग्रजी या अभ्यासक्रमातूनच शिकलेले आहेत. मग ज्या शिक्षकांचे इंग्रजी मुळातच कच्चे आहे ते केवळ ६ ते ८ दिवसांच्या प्रशिक्षणामुळे फाड-फाड इंग्रजी बोलतील, स्पष्ट व व्यवस्थित शब्दोच्चार करतील, तणावरहित अनौपचारिक वातावरण निर्माण करतील अशी अपेक्षा करण्यात काय अर्थ आहे ? ९. 'सक्ती' करून सर्व गोष्टी साध्य होतातच असे नाही. त्यापेक्षा आपणहून ती कृती करण्यास लोकांनी उद्युक्त व्हावे असे प्रयत्न करणे महत्त्वाचे. सक्तीमुळे पालकांवरील व शिक्षकांवरील दबाव, ताण वाढेल. विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण वाढेल. यामुळे इंग्रजीभाषेविषयी नावड निर्माण होऊ शकेल अशी शंका आहे. १०.पहिलीपासून इंग्रजी हवे तर बालवाडीपासून का नको असेही काही जण म्हणतील. बालवाडीत लगेच इंग्रजी सुरू केले जाईल. भाषा ऐकून बोलून येते म्हणून, दोन-अडीच वर्षाच्या मुलाला इंग्रजी समजावे यासाठी

प्रयत्न करण्यात येतील. असे झाले तर बालवाडीचा मूळ उद्देश मागे पडेल. मातृभाषेतून बालकाचे होणारे सहजशिक्षण व व्यक्तिमत्त्व विकास हे दूरच राहील. घरातील वातावरण व शाळेतील वातावरण यात अंतर पडून ते मूल आणखी गोंधळेल व त्याच्यावरील मानसिक ताण वाढेल. यातून बालकाच्या आरोग्यविषयक तक्रारी वाढू शकतात. तसेच काही सामाजिक प्रश्नही यातून निर्माण होतील.

११. इंग्रजीला सहा ऐवजी दहा वर्षे द्यायची यामुळे इंग्रजीचे महत्त्व पालकांच्या मनावर वाजवीपेक्षा जास्त ठसेल. चार वर्षानंतर मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून जाऊ पाहतील. त्यांना रोखणे अवघड जाईल. १२. पहिलीपासून इंग्रजी आणण्यापेक्षा पाचवी ते दहावीच्या इंग्रजीच्या शिक्षकांचा दर्जा वाढविण्यासाठी दूरगामी उपायांची गरज आहे. किंबहुना ते अधिक फलदायी ठरतील. १३. विकसित देशांत महाविद्यालयीन समजले गेलेले विषय माध्यमिक शाळेत आणि माध्यमिक समजले गेलेले विषय प्राथमिक शाळेत आणण्याची वृत्ती आहे, आपल्याकडेही याला सुरूवात झाली आहे.

■■

*ह्या इंग्रजी शिक्षणानेच आमचा स्वाभिमान नष्ट झाला. त्यामुळेच विलायती व्यापाऱ्यांचे उखळ पांढरे झाले. आमचा धर्माभिमान गळाला, धैर्य पळाले. कोणीहि आम्हांस तुच्छ लेखावे आणि त्या गोऱ्यांची अरेरावी मात्र सारखी वाढत जावी. आमची बुद्धिमत्ता, कल्पकता, उमेद, साहसप्रियता इत्यादि सद्गुणांची पार माती झाली. ते जळून भस्म झाले ! तेव्हा ज्ञानसंपादन सर्व स्वभाषेतूनच व्हावे, अनिर्वाह-प्रसंगी उपयोगी पडण्यापुरते इंग्रजी भाषेचे ज्ञान असले म्हणजे पुरे. मुसलमानी राज्यांत कुठे त्यांच्या भाषेतूनच मिळणाऱ्या शिक्षणावाचून आमचे अडले होते? तेव्हाहि स्वभाषांतूनच ज्ञान संपादून आम्ही त्या राज-बादशहांच्या दिवाणगिऱ्याहि नाही का चालवू शकलो? एक भाषा आणि ती आपली मातृभाषा उत्तम येत असली म्हणजे बस्स ! सर्व भरतखंड यवनाक्रांत झाले असताहि श्रीछत्रपति शिवाजीमहाराज आणि श्रीरामदास ह्यांनी स्वधर्म आणि स्वराष्ट्र ह्यांचा पूर्णोद्धार, एकट्या आपल्या मराठी भाषेतूनच मिळविलेल्या ज्ञानाच्या बळावरच नाही का घडवून आणिला? भट-पेशव्यांचे किंवा फडणीस-भानूंचे पराक्रम काय अरबी, फारशी, किंवा इंग्रजी व फ्रेंच ह्या भाषांच्या ज्ञानाभावाने थिजून राहिले? सारांश, इंग्रजीद्वारा ज्ञानसर्वस्व मिळविण्यासाठी आम्ही जी माथेफोड सध्यां करीत सुटतो तीच आमच्या शारीरिक व मानसिक दौर्बल्यास कारण आहे.*

*- उषःकालमाला, टिळक अंक पृ. ३९.*

# अर्थबोधपत्रिका

अर्थबोधपत्रिकेचे सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज

दिनांक :

संपादक, 'अर्थबोधपत्रिका',
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून अंक क्रमांक ———पासून नोंदवून घ्यावे. पुढील सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

**(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)** ____________________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

____________________

____________________ | | | | | | |

____________________

संबंधित संस्थेचे नाव व पत्ता : ____________________

____________________

____________________

____________________ | | | | | | |

____________________

सही

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली जातात. अशा चर्चासत्रात सहभागी होण्याच्या दृष्टीने आपल्या आवडीचे विषय

____________________

# सूचना

- चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. **पुण्याच्या बँकेवरीलच चेक मान्य करण्यात येतील.**
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

**'अर्थबोधपत्रिका' विनामूल्य मिळविण्याची योजना**

अर्थबोधपत्रिकेचे उद्दिष्ट व लेखांचे स्वरूप आपल्याला आवडले असेल तर आपण आम्हाला वाचकवृद्धीसाठी मदत करावी, अशी विनंती करीत आहोत. वाचकवृद्धीच्या या योजनेतून आपल्याला एका वर्षभरातील अंक विनामूल्य मिळू शकतील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

- या योजनेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीस एकावेळी कमीत कमी पाच नवीन देणगीदार मिळवून द्यावे लागतील.
- अशी जमा केलेली देणगीमूल्याची रक्कम (कमीत कमी रु. २५०/-) एकत्रितपणे देणगीदारांच्या सभासदत्वाच्या अर्जासहित रोख, डिमांड ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने आमच्याकडे पाठवावी लागेल. (या योजनेखाली चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही)
- अशा रितीने देणगीमूल्य देणारे कमीत कमी पांच नवीन सभासद मिळवून देणारांस 'अर्थबोध' पत्रिकेचे पुढील सहा अंक विनामूल्य पाठविले जातील.
- ही योजना अल्पकाळापुरतीच मर्यादित असून पुरेशी सभासद नोंदणी झाल्यावर कोणतीही पूर्वसूचना न देता ती बंद करण्यात येईल.

## 'सॉफ्टवेअर'चा असाही इतिहास

संगणकाचा वापर बहुतेक सर्व राष्ट्रात जास्तीत जास्त क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यामुळे संगणकाशी संबंधित शब्द डाटाबेस, इंटरनेट, डाऊनलोड, व इतर अनेक शब्द वेगवेगळ्या बोलीभाषेत जसेच्या तसे रूळले आहेत. असे शब्द रूढ होतांना अनेकदा त्याच्यामागे काहीतरी गंमतशीर इतिहास असतो. हा इतिहास शोधणे म्हणजेच व्युत्पत्तिशास्त्र. 'येल लॉ स्कूल' येथे सध्या विविध शैक्षणिक जर्नल्सचा डाटाबेस वापरून 'येल डिक्शनरी ऑफ कोटेशन्स' तयार करण्यात येत आहे. नवीन शब्द व वाक्प्रचार यांचे मूळ शोधतांना या डिक्शनरीचे संपादक फ्रेड शापिरो यांना असे आढळले की आज संगणकाशी संबंधित असलेले 'सॉफ्टवेअर' व 'हार्डवेअर' हे शब्द आजचे नाहीत. प्रिस्टन विद्यापीठातील जॉन टर्की या गणितज्ञाने १९५८ मध्ये हे दोन शब्द प्रथम वापरले होते. 'अमेरिकन मॅथमॅटिकल मंथली' या नियतकालिकात लिहिलेल्या एका लेखात त्यांनी इलेक्ट्रॉनिक कॅलक्यूलेटरच्या संबंधीच्या एका परिच्छेदात हे शब्द वापरले होते. आतापर्यंत १९६० मध्ये हे शब्द प्रधम वापरात आले अशी नोंद होती. याहीपेक्षा एक महत्त्वाची घटना शापिरो यांच्या एका सहकाऱ्याने लक्षात आणून दिली की 'सॉफ्टवेअर' व 'हार्डवेअर' हे शब्द १८५० मध्येच वापरले गेले आहेत. कचऱ्याचे ढिगारे उपसतांना कचरा विभागाशी संबंधित कामगार मातीत मिसळून जाणाऱ्या किंवा पुनर्प्रक्रिया करता येणाऱ्या कचऱ्याला 'सॉफ्ट-वेअर' व ज्या कचऱ्याचा पुढे काहीही उपयोग करता येत नाही असा, म्हणजेच विघटन न होणाऱ्या अशा कचऱ्याला 'हार्ड-वेअर' असे म्हणत असत. आजही संगणक क्षेत्रात 'गार्बेज इन' व 'गार्बेज आऊट' हे शब्द वापरले जातातच. आजही संगणकाचे 'हार्ड-वेअर' हे विघटन न होणा-या कचऱ्यात मोडते ही वस्तुस्थिती आहे.

(संदर्भ: 'द इकॉनॉमिस्ट' ३ जून ते ९ जून २०००)

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून अर्थबोधपत्रिका प्रकाशित केली जात आहे.


## - संस्थेचे मंडळ -

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर
आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज
व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस
ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर